सुवर्ण मणि प्रवाळ आभूषणे सुशोभित ॥44॥
स्पर्शाने पुरुष ज्यांच्या उन्मादग्रस्त दिसती ।

आगुर्विंशतिसाहस्रा नन्दनादप्सरोगणा:॥45॥

नारदस्तुम्बरुर्गोप: प्रभया सूर्यवर्चस:।

एते गन्धर्वराजानो भ्रतस्याग्रतो जगु:॥46॥

अप्सरा सहस्र वीस येति नन्दनवनातुनि ॥45॥

नारद तुम्बरु गोप सूर्यासम प्रकाशित ।

गन्धर्वराज तीन ते गातात भरतापुढे ॥46॥

अलम्बुषा मिश्रकेशी पुण्डरीकाथ वामना ।

उपानृत्यान्त भरतं भरद्वाजस्य शासनात ॥47॥

अल्म्बुषा,मिश्रकेशी पुण्डरीका नि वामना ।
भरद्वाज आज्ञेने नृत्य करिती भरतापुढे ॥47॥
यानि माल्यानि देवेषु यानि चैत्ररथे वने ।
प्रयागे तान्यदृश्यन्त भरद्वाजस्य तेजसा ॥48॥
उद्यानि देवतांच्या वा चैत्ररथ वनामध्ये ।
फुले दिसति प्रयागी भरद्वाज कृपेने ॥48॥
बिल्वा मार्दङ्गिका आसन् शम्याग्राह्या बिभीतकाः ।
अश्वत्था नर्तकाश्वासान् भर्द्वाजस्य तेजसा ॥49॥

**वाजवती मृद्‌ड्‌ग बेल, ताल शम्या बेहडे ।**

**भरद्वाज तेजाने पिंपळ वृक्ष नाचती ॥49॥**

वृक्षही नाचू वाजवु लागले

**ततः सरलतालाश्च तिलकाः सतमालकाः।**

**प्रहृष्टास्तत्र सम्पेतु कुब्जा भूत्वाथ वामनाः॥50॥**

**ताल तिलक तमाल देवदारु ठेंगू कुबडे ।**

**हर्षे होउनिया होती भरतसेवा उपस्थित ॥50॥**

शिंशपाऽऽमलकी जम्बूर्याश्चान्या: कानने लता:।
मालती मल्लिका जातियश्चान्या: कानने लता:।
प्रमदाविग्रहं कृत्वा भरद्वाजाश्रमेऽवसन ॥51॥

आमलक जम्बू स्त्रीलिङ्गी तथा मालति मल्लिका ।
इत्यादि वनलता येती स्त्रीरूप धारूनिया ।
भरद्वाज आश्रमात वसती येवोनिया ॥51॥

सुरां सुरापा: पिबत पायसं च बुभुक्षिता:।
मांसानि च सुमेध्यानि भक्श्यन्तां यो यदिच्छति॥52॥

लता ज्या स्त्रीरूपे येती त्या

सांगती करण्या लोकां मधुपान करावया।

पायस घ्या भुकेल्यांनो फळातिल गरही तसा ॥52॥

उच्छोद्य स्थापयन्ति स्म नदीतीरेषु वल्गुषु।

अप्येकमेकं पुरुषं प्रमदा: सप्त चाष्ट च ॥53॥

नदीतीरावर स्त्रिया सात आठ घेऊनिया ।

पुरुषा लावुनी उटणे सचैल स्नान घालती ॥53॥

संवाहन्त्य: समापेतुर्नार्यो विपुललोचना:।
परिमृज्य तदान्योन्यं पाययन्ति वराङ्गना:॥54॥
विशालाक्षी स्त्रिया अङ्ग पुसुनी वस्त्रे अन्य ।
देउनी पेय त्यासवे सेवा करती पाय चेपुनी ॥54॥
हयान् गजान् खरानुष्ट्रांस्तथैव सुरभे: सुतान् ।
अभोजयन् वाहनपास्तेषां भोज्यं यथाविधि ॥55॥
अश्वा गजां खरां उष्ट्रां बैलां वाहन चालकां ।
दाणापाणी तयां देती नियुक्त नर त्यास्तव ॥55॥

इखूश्च मधुलाजांश्च भोजयन्ति स्म वाहनान् ।
इक्ष्वाकुवरयोधानां चोदयन्तो महाबला: ॥56॥
इक्ष्वाकूंच्या योध्यांच्या वाहकां देति भोजन ।
इक्षु मधुमिश्रित लाजां त्या आग्रहे खाउ घालती ॥56॥
नाश्वबन्धोऽश्वमाजानान्न गजं कुञ्जरग्रह:।
मत्तप्रमत्तमुदिता सा चमूस्तत्र सम्बधौ ॥57॥
अश्वपाल न अश्वास माहूत हत्तिना तसे ।
न जाणति स्थान त्यांचे सर्व मत्त प्रमत्त ते ॥57॥

तर्पिता: सर्वकामैश्च रक्तचंदनरूषिता:।
अप्सरोगणसंयुक्ता: सैन्या वाचमुदीरयन ॥58॥
इच्छित पदार्थे तुष्ट रक्तचंदनचर्चित ।
अप्सरांत रममाण ऐसे वदु लागती ॥58॥
नैवायोध्यां गमिष्यामो न गमिष्याम दण्डकान ।
कुशलं भरतस्यास्तु रामस्यास्तु तथा सुखम ॥59॥
होवो कल्याण भरताचे रामाचेहि तसेच हो ।
न जाइन अयोध्येस न तैसे दंडक वनी ॥59॥

इति पादातयोधाश्च हस्त्यश्वारोहबन्धकाः।

अनाथास्तं विधिं लब्ध्वा वाचमेतामुदीरयन् ॥60।

पादाति अश्वस्वार गजस्वार माहूतही।

सत्कारे स्वच्छंद होती आणि ऐसेच बोलती ॥60॥

संप्रहृष्टा विनेदुस्ते नरास्तत्र सहस्रशः।

भरतस्यानुयातारः स्वर्गोऽयमिति चाब्रुवन् ॥61॥

नर सहस्र आलेले भरतासह अति हर्षित।

वैभवा त्या पाहुनीया स्वर्ग हा वदती असे ॥61॥

नृत्यन्तश्च हसन्तश्च गायन्तश्चैव सैनिकाः ।
समन्तात परिधावन्तो माल्योपेताः सहस्त्रशः ॥62॥

नाचती हसती गाती फुलांचे हार घालुनी ।
सैनिक सहस्त्रावधि धावती सगळीकडे ॥62॥

ततो भुक्तवतां तेषां तदन्नममृतोपमम् ।
दिव्यानुवीक्ष्य भक्ष्यांस्तानभवद् भक्षणे मतिः॥63॥

भोजने तृप्त जरि झाले स्वादिष्ट पदार्थ पाहूनी
तरी पुन्हा करावेसे भोजन त्याना वाटते ॥63॥

प्रेष्याश्चेट्यश्च वध्वश्च बलस्थाश्चापि सर्वशः।
बभूवुस्ते भृशं प्रीताः सर्वे चाहतवाससः॥64॥
सैनिक स्वस्त्रियासंगे दासदासी तसेचही।
नेसुनी नववस्त्रास अतिप्रसन्न होति ते ॥64॥
कुञ्जराश्च खरोष्ट्राश्च गोऽश्वाश्च मृगपक्षिणः।
बभूवुः सुभृतास्तत्र नातो ह्यन्यमकल्पयत ॥65॥
गज अश्व उंट बैल गर्दभ मृग पक्षिही तसे ।
पूर्ण तृप्त होती तयां इच्छा न कोणती उरे ॥65॥

नाशुक्लवासास्तत्रासीत क्षुधितो मलिनोऽपि वा ।
रजसा ध्वस्तकेशो वा नरः कश्चिददृश्यत ॥66॥

असा कोणि नसे तेथे वस्त्र शूभ्र ज्याचे नसे ।
भुकेला अस्वच्छ ज्याचे केश धुळिने माखले ॥66॥

आजेश्चापि च वाराहैर्निष्ठानवरसंचयैः।
फलनिर्वृहत्संसिद्धैःसूपैर्गन्धरसान्वितैः॥67॥
पुष्पध्वजवतीः पूर्णाः शुक्लस्यान्नस्य चाभितः।
ददृशुर्विस्मितास्तत्र नरा लौहीः सहस्त्रशः॥68॥

सहस्र सुवर्ण पात्रात फळांचे रस काढुनी ।
शिजविलेली मिष्टान्ने ठेवली असती तिथे ॥67॥
सुगन्धित रसे युक्त सुशोभित पुष्पध्वजे ।
भरतासह आलेले जन आचंबित पाहुनी ॥68॥
बभूवुर्वनपार्श्वेषु कूपाः पायसकर्दमाः।
ताश्च कामदुघा गावो द्रुमाश्चासन् मधुच्युतः॥69॥
स्वादिष्ट पायसे कूप भरलेले वनातिल ।
कामधेनु सर्व गाई मधुवर्षा करती तरु ॥69॥

वाप्यो मैरेयपूर्णाश्च मृष्टमांसचयैर्वृता:।
प्रतप्तपिठरैश्चापि मार्गमायूरकौक्कुटै:॥70॥
निषादादि लोकांस्तव कूप भरलेले मधु ।
कुण्डात पक्व केलेले मयूर कुक्कुट मांसही ॥70॥॥
पात्रीणां च सहस्राणि स्थालिनां नियुतानि च
न्यर्बुदानि च पात्रानि शातकुम्भमयानि च ॥71॥
सहस्र अन्नपात्रे तशी भोजनपात्रे लक्षावधि ।
अन्नग्रहणासाठी थाळ्या कोट्यावधि संग्रही ॥71॥

स्थाल्य: कुम्भ्य: करम्भ्यश्च दधिपूर्णा: सुसंस्कृता:।
यौवनस्थस्य गौरस्य कपित्थस्य सुगन्धिन:॥72॥
हृदा: पूर्णा रसालस्य दध्न: श्वेतस्य चापरे।
बभूवु: पायसस्यान्ये शर्कराणां च संचया:॥73॥

कुम्भ सान भरलेले दधि स्वादिष्ट ज्यामध्ये ।
विविध रस भरलेले सुरुची द्रव्ये मिसळूनी ॥72॥
जलाऐवजी तलाव भरले तक्रे सुगंधित ।
कुण्ड दूधदहीयुक्त शर्करा ढीगही तसे ॥73॥

कल्कांश्चूर्णकषायांश्च स्नानानि विविधानि च ।
ददृश जनस्थानि तीर्थेष सरितां नरा:॥74॥

स्नानास्तव घाटावर पात्री चूर्ण सुगंधित।
विविध स्नानोपयोगी पदार्थ असति ठेवले॥74॥

शुक्लानंशुमतश्चापि दन्तधावनसंचयान्।
शुक्लांश्चन्दनकल्कांश्च समुद्रेष्ववतिष्ठत:॥75॥

दन्तधावन ते शूभ्र पात्रात चन्दन उटी।
मुखक्षालनासाठी पाहती लोक सर्व हे ॥75॥

दर्पणान् परिमृष्टांश्च वाससां चापि संचयान् ।
पादुकोपानहं चैव युग्मान्यत्र सहस्रश: ॥76॥
अनेक दर्पण स्वच्छ वस्त्रे सुंदर ती तशी।
जोड्या पादत्राणांच्या खडावा सहस्रावधि ॥76॥
आञ्जनी: कङ्कतान् कूर्चाश्छत्राणि च धनूषि च ।
मर्मत्रानानि चित्राणिशयनान्यासनानि च ॥77॥
कंगवे काजळ कूर्च धनुष्य छत्रही तसे ।
कवच रक्षक मर्मास शय्या आसने तशी ॥77।

प्रतिपानह्रदान्पूर्णान् खरोष्ट्रगजवाजिनाम् ।
अवगाह्यसुतीर्थांश्च ह्रदान् सोत्पलपुष्करान् ।
आकाशवर्णप्रतिमान् स्वच्छतोयान् सुखाप्लवान् ॥78॥

जलाशय पिण्या पाणी गजां अश्व खरांसही।
घाट सुंदर उपयुक्त जल तराया उत्तम ।
आकाशासम स्वच्छ कमल उत्पल शोभती ॥78॥

नीलवैदूर्यवर्णांश्च मृदून् यवससंचयान् ।
निर्वापार्थं पशूनां ते ददृशुस्तत्र सर्वशः॥79॥

वैडूर्य मण्यासम हरित गवत सर्वत्र ठेविले

खाण्यास्तव पशूंसाठी पाहती सर्व लोक हे ॥79॥

व्यस्मयन्त मनुष्यास्ते स्वप्नकल्पं तदद्भुतम्

दृष्ट्वाऽऽतिथ्यं तादृग् भरतस्य महर्षिणा ॥80॥

महर्षिनी केलेले भरताचे सैन्यासवे ।

आतिथ्य स्वप्नवत वाटे विस्मये चकित सर्वही ॥80॥

इत्येव रममाणानां देवानामिव नन्दने ।

भरद्वाजाश्रमे रम्ये सा रात्रिर्यत्यवर्तत ॥81॥

नंदनवनि देवांच्या भरद्वाज आश्रमी तसे।
क्रीडा करति राहोनी रात्र घालविती सुखे ॥81॥

प्रतिजग्मुश्च ता नद्यो गन्धर्वाश्च यथागतम्।
भरद्वाजमनुज्ञाप्य ताश्च सर्वा वराङ्गना:॥82॥

आज्ञेने भरद्वाजांच्या नद्या गन्धर्व सुन्दरी ।
निघून समस्त जाती जेथुनी आले तसे ॥82॥

तथैव मत्ता मदिरोत्कटा नरास्तथैव दिव्यागुरुचन्दनोक्षिता:।
तथैव दिव्या विविधा: सगुत्तमा: पृथग्विकीर्णा मनुजै: प्रमादिता:॥83॥

तसेच उन्मत्त मदिरोत्कट राहती देह त्यांचे चंदनचर्चित तसेच ।
तसेच दिव्य पुष्पहारहि उत्तम विखुरलेले दिसती अनेक ॥83॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकनवतितमः सर्गः॥91॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 92

ततस्तां रजनीं व्यश्य भरत: सपरिच्छद:।
कृततिथ्यो भरद्वाजं कामादभिजगाम ह ॥1॥

सपरिवार भरद्वाज आतिथ्या ग्रहण करुनि।
रात्र घालवुनी जाई आज्ञा घेण्या निघायची ॥1॥

तमृषिः पुरुषव्याघ्र प्रेक्ष्य प्राञ्जलिमागताम्।
हताग्निहोत्रो भरतं भरद्वाजोऽभ्यभाषत ॥2॥

पुरुषसिंह भरतास पाहुनीया कृताञ्जलि ।
करुनिया अग्निहोत्रा भरद्वाज म्हणती तया ॥2॥

कच्चिदत्र सुखा रात्रिस्तवास्मद्विषये गता ।
समग्रस्ते जनः कच्चिदातिथ्ये शंस मेऽनघ ॥3॥

आश्रमात कशी गेली रात्र भरता तुझी ।
जन तुझे झाले का संतुष्ट आतिथ्ये मम ॥3॥

तमुवाञ्जलिं कृत्वा भरतोऽभिप्रणम्य च ।
आश्रमादुपनिष्क्रान्तमृषिमुत्तमतेजसम् ॥4॥

आश्रमाबाहेर येती त्या तेजस्वी महर्षिना।

प्रणाम करुनी हात जोडून भरत बोलला॥4॥

सुखोषितोऽस्मि भगवन् समप्रबलवाहनः।

बलवत्तर्पितश्चाहं बलवान् भगवंस्त्वया ॥5॥

राहिलो ससैन्य सुखे भगवन् आपल्याकडे ।

सैनिकांसह आपण तृप्त केले पूर्ण मज ॥5॥

अपेतक्लमसंतापा: सुभिक्षा: सुप्रतिश्रया:।

अपि प्रेष्यानुपादाय सर्वे स्म सुसुघोषिता:॥6॥

त्रास न कुठला होता चविष्ट अन्नपानासह।
सुखद गृहे राहुनी रात्र व्यतित उत्तम ॥6॥
आमन्त्रयेऽहं भगवन् कामं त्वामृषिसत्तम ।
समीपं प्रस्थितं भ्रातुर्मैत्रेणेक्षस्व चक्षुषा ॥7॥
आज्ञा घेण्यास आलो मी इच्छेनुसार आपल्या।
बंधुकडे मज जाता सस्नेह दृष्टिने पहा ॥7॥
आश्रमं तस्य धर्मज्ञ धार्मिकस्य महात्मनः।
आचक्ष्व कतमो मार्गः कियानिति च शंस मे॥8॥

धर्मज्ञ सांगा आश्रम श्रीरामाचा असे कुठे ।
सांगा मज किती दूर मार्गही कोणता असे ॥8॥
इति पृष्टस्तु भरतं भ्रातुर्दर्शनलालसम् ।
प्रत्युवाच महातेजा भरद्वाजो महातपा:॥9॥
बंधुदर्शन इच्छेने विचारी भरतास त्या ।
महातेजस्वि भरद्वाज असे उत्तरती तया ॥9॥
भरतार्ध तृतीयेषु योजनेष्वजने वने ।
चित्रकूटगिरिस्तत्र रम्यनिर्झरकानन:॥10॥

दहा कोसांवरती चित्रकूट निर्जन वनी ।
पर्वत असे तेथील रम्य वनश्री निर्झर ॥10॥

उत्तरं पार्श्वमासाद्य तस्य मन्दाकिनी नदी।
पुष्पितद्रुमसंछन्ना रम्यपुष्पितकानना॥11॥
अनंतरं तत्सरितश्चित्रकूटं च पर्वतम् ।
तयोः पर्णकुटीं तात तत्र तौ वसतो ध्रुवम् ॥12॥

उत्तर किनारी त्याच्या वाहे मन्दाकिनी नदी ।
वनी रम्य पुष्पयुक्त वृक्षाच्छादित ती असे ॥12॥

पलीकडे चित्रकूट असे दोन्हींच्या मध्ये ।
श्रीराम लक्ष्मण जेथे करती वास निश्चित ॥12॥
दक्षिणेन च मार्गेण सव्यदक्षिणमेव च ।
गजवाजिसमाकीर्णां वाहिनीं वाहिनीपते॥13॥
वाहवस्य महाभाग ततो द्रक्ष्यसि राघवम् ।
दक्षिण किनारी मार्ग गजअश्व सेनेसह।
पुढे जाता मार्ग दोन डावीकडुन दक्षिणेकडे ॥13॥
जाता त्यावरुनी शीघ्र होत श्रीरामदर्शन ।

प्रयाणमिति च श्रुत्वा राजराजस्य घोषित:॥14॥

हित्वा यानानि यानार्हा ब्राह्मणं पर्यवारयन्।

ऐकुनिया निघायाचे रथा सोडुनिया येति ॥14॥

राजस्त्रिया भरद्वाजा प्रणाम करण्यास्तव ।

वेपमाना कृशा दीना सह देव्या सुमित्रया॥15॥

कौसल्या तत्र जग्राह कराभ्यां चरणौ मुने:।

कृश दीन रडणारी कौसल्या सुमित्रेसह ॥15॥

करी वंदन येऊनी मुनिपादां धरूनिया ।

असमृद्धेन कामेन सर्वलोकस्य गर्हिता॥16॥
कैकेयी तत्र जग्राह चरणौ सव्यपत्रपा।
तंप्रदक्षिणमागम्य भगवन्तं महामुनिम् ॥17॥
अदूराद् भरतस्यैव तस्थौ दीनमनास्तदा ।

असफल इच्छेमुळे सर्वांनी निन्दित अशी॥॥16॥
लज्जिता चरणस्पर्श मुनींचा ती करोनिया।
भगवान भरद्वाजा प्रदक्षिणा घालोनिया ॥17॥
उभी भरताजवळी राहे दीनचित्त ती ।

तत्र पप्रच्छ भरतं भरद्वाजो महामुनिः॥18॥
विशेषं ज्ञातुमिच्छामि मातृणां तव राघव ।
महामुनि भरद्वाज भरतास विचारती ॥18॥
परिचय तव मातांचा विशेषे जाणु इच्छितो।
एवमुक्तस्तु भरतो भरद्वाजेन धार्मिकः॥19॥
उवाच प्राञ्जलिर्भूत्वा वाक्यं वचनकोविदः।
विचारता भरद्वाजे सम्भाषणकुशल तो॥19॥
भरत जोडुनिया हात देइ उत्तर त्यां असे ।

यामिमां भगवन् दीनां शोकनशनकर्शिताम्॥20॥

पितुर्हि महिषीं देवी देवतामिव पश्यसि।

एषां तं पुरुषव्याघ्रं सिंहविक्रान्तगामिनम्॥21॥

कौसल्या सुषुवे रामं धातारमदितिर्यथा।

दुःखी दुर्बल जी शोके उपवासे दृगोचर ॥20॥

कौसल्या ज्येष्ठ पत्नी पित्याची ती असे मम ।

अदितिने जसे धात्या आदित्या निर्मिले तसे॥21॥

जन्मास घालि कौसल्या रामा सिंहपराक्रमी ।

अस्यां वामभुजंश्लिष्टा या सा यिष्ठति दुर्मना:॥22॥
इयं सुमित्रा दु:खार्ता देवी राज्ञस्य मध्यमा ।
कर्णिकारस्य शाखेव शीर्णपुष्पा वनान्तरे॥23॥
एतस्यास्ति सुतौ देव्या: कुमारी देववर्णिनौ।
उभौ लक्ष्मणशत्रुघ्नौ वीरौ सत्यपराक्रमौ॥24॥
डाव्या खांद्यास लागून तिच्या जी उदास उभी ॥22॥
सुमित्रा तीच दु:खार्ता पित्याची पत्नि मध्यमा ।
कण्हेरीच्या शाखेसम पुष्पहीन वनी दिसे ॥23॥

तिचेच असती पुत्र देवतातुल्य दोन हे ।
लक्ष्मण शत्रुघ्न असे सत्यपराक्रमि वीर जे॥24॥

यस्या: कृते नरव्याघ्रौ जीवनाशमितो गति:।
राजा पुत्रविहीनश्च स्वर्ग: दशरथो गत:॥25॥
क्रोधनामकृतप्रज्ञां दृप्तां सुभगमानिनीम् ।
ऐश्वर्यकामां कैकेयीमनार्यामार्यरूपिणीम्॥26॥
ममैतां मातरं विद्धि नृशंसां पापनिश्चयाम्।
यतोमूलं हि पश्यामि व्यसनं महदात्मन:॥27॥

जिच्यामुळे नरव्याघ्र वनी संकटी पातले।
दशरथ स्वर्गवासी पुत्रविहीन जाहले ॥25॥
क्रोधी निर्बुद्ध गर्विष्ठ रूपवान समजे स्वता।
आर्या असुनि अनार्या राज्यलोभी कैकेयी ॥26॥
असे हीच मम माता पापनिश्चय क्रूर ही।
उभे संकट जे आज त्यास कारण जी असे ॥27॥
इत्युक्त्वा नरशार्दूलो बाष्पगद्गद्या गिरा ।
विनि:श्वस्य स ताम्राक्ष: क्रुद्धो नाग इव स्वसन ॥28॥

बाष्पगद्गद वाणीने बोलुनी नरशार्दुल ।
रक्तनेत्र नि:श्वसे तो क्रुद्ध नागापरी दिसे ॥28॥

भरद्वाजो महर्षिस्तं ब्रुवन्तं भरतं तदा ।
प्रत्युवाच महाबुद्धिरिदं वचनमर्थवित ॥29॥

भरता हे बोलणाऱ्या उत्तरति भरद्वाज ।
महाबुद्धि जाणति जे रामावतार प्रयोजन ॥29॥

न दोषेणावगन्तव्या कैकेयी भरत त्वया ।
रामप्राव्राजनं ह्येतत सुखोदकं भविष्यति ॥30॥

दोषदृष्टि भरता तू न धरी कैकेयीप्रति
वनवास श्रीरामाचा सुखद भविष्यास्तव ॥30॥

देवानां दानवानां च ऋषीणां भावितात्मनाम् ।
हितमेव भविष्यद्धि रामप्रव्राजनादिह ॥31॥

देव दानव ऋषि परमात्मा चिन्तनात जे ।
मग्न त्या हित सर्वांचे श्रीराम जाण्यात वनी ॥31॥

अभिवाद्य तु संसिद्धः कृत्वा चैनं प्रदक्षिणम् ।
आमन्त्र्य भरतः सैन्यं युज्यतामिति चाब्रवीत ॥32॥

अभिवादुनि मुनींना घालुनीया प्रदक्षिणा ।
सैन्या भरत बोलावी आज्ञापी निघण्यास्तव॥32॥

ततो वाजिरथान् युक्त्वा दिव्यान् हेमविभूषितान् ।
अध्यारोहत् प्रयानार्थं बहून् बहुविधो जनः॥33॥

वस्त्रभूषित जन ते जोडुनीया अश्व रथ ।
तयार सुवर्णभूषित होती स्वार यात्रेस्तव ॥33॥

गजकन्या गजाश्चैव हेमकक्ष्याः पताकिनः।
जीमूता इव धर्मान्ते सघोषाः सम्प्रतस्थिरे ॥34॥

हस्तिनी गज सोन्याच्या सूत्रे बद्ध फडकति ।
फडकति पताका घण्टानाद मेघगर्जनेपरी ॥34॥

विविधान्यपि यानानि महान्ति च लघूनि च ।
प्रययु: सुमहार्हाणि पादैरपि पदातय:॥35॥

यानातुनि छोट्या मोठ्या जाति अधिकारी जन ।
सैनिक पायदळातील चालती त्यांच्यासवे ॥35॥

अथ यानप्रवेकैस्तु कौसल्याप्रमुखा: स्त्रिय:।
रामदर्शनकांक्षिण्य: प्रययुर्मुदितास्तदा ॥36॥

पाठोपाठ सर्व राण्या प्रसन्न कौसल्येसह ।

रामदर्शन इच्छेने यानि उत्तम बैसुनी ॥36॥

चन्द्रार्कतरुणाभासां नियुक्तां शिबिकां शुभा:।

आस्था य प्रययौ श्रीमान् भरत: सप्रिच्छद:॥37॥

शिबिकेत चन्द्रसूर्या सम उज्वल भरतही।

सामग्रिसह बसे नेती खांद्यावरूनि सेवक ॥37॥

सा प्रयाता महासेना गजवाजिसमाकुला।

दक्षिणां दिशमावृत्य महामेघ इवोत्थित:।38॥

गजअश्वयुक्त सेना व्यापुनी दक्षिण दिशा।
जणु मेघसमुदाय विशाल पथि चालत ॥38॥

वनानि च व्यतिक्रम्य जुष्टानि मृगपक्षिभिः।
गङ्गायाः परवेलायां गिरिष्वस्य नदीष्वपि॥39॥

गङ्गा करुनिया पार मृग पक्षि युक्त वने ।
ओलांडून जवळील पुढे जाति सर्व ते ॥39॥

सा सम्प्रहृष्टद्विपवाजियूथा वित्रसयन्ति मृगपक्षिसंधान ।
महदनं तत प्रविगाहमाना रराज सेना भरतस्य तत्र ॥40॥

गजअश्व सेनेतिल ते प्रसन्न वनी पक्षिमृगां भयभीत करित ।
विशाल वनात भरताचि सेना प्रवेश करुनी विराजत असे ॥40॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे दिनवतितमः सर्गः॥92॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 93

तया महत्या यायिन्या ध्वजिन्या वनवासिन:।
अर्दिता यूथपा मत्ता: सयूथा: सम्प्रदुद्रुव्य:॥1॥
दला येवढ्या मोठ्या पाहुनि भीतिग्रस्त जे।
वनवासी यूथपति हत्ती मत्त जाती तेथुनी ॥1॥
ऋक्षा: पृषतमुख्याश्च रुरवश्च समन्तत:।
दृश्यन्ते वनवाटेषु गिरिष्वपि नदीषु च ॥2॥

पृषत रुरु मृग प्राणी अस्वल वनातीलही।
पर्वत नदी यावरी दिसती सैन्यपीडित ॥2॥

स सम्प्रतस्थे धर्मात्मा प्रीतो दशरथात्मजः।
वृतो महत्या नादिन्यचतुरङ्गया॥3॥

चतुरंग सेना विशाल नाद त्याचा ऐकत ।
भरत प्रसन्नचित्त त्यांच्यासह यात्रा करी ॥3॥

सागरौघनिभा सेना भरतस्य महात्मनः।
महीं संछादयामास प्रावृषि द्यामिवाम्बुदः॥4॥

मेघाच्छादित आकाश वर्षा ऋतुमध्ये जसे।
सागरासम सेनेने आच्छादित भूभाग त्या ॥4॥
तुरङ्गोघैरवतता वारणैश्च महाबलैः।
अनालक्ष्या चिरं कालं तस्मिन् काले बभूव सा॥5॥
अश्वसमूह बलशाली गजयुक्त सेना एवढी।
पसरे दूर दृष्टीत सामावणे अशक्य जी ॥5॥
स गत्वा दूरमध्यानं सम्परिश्रान्तवाहनः।
उवाच वचनं श्रीमान् वसिष्ठं मन्त्रिणां वरम् ॥6॥

जाता दूर भरतसेना होतसे अतिश्रान्त जी ।
ज्येष्ठ मन्त्रि वसिष्ठांस श्रीमान भरत वदे ॥6॥

यादृषं लक्ष्यते रूपं यथा चैव मया श्रुतम् ।
व्यक्तंप्राप्ता: स्म तं देशं भरद्वाजो यमब्रवीत॥7॥

कथिले जे भरद्वाजे पाहुनी प्रदेशास या ।
वाटते आपण आलो आहोत प्रदेशात त्या ॥7॥

अयं गिरिश्चित्रकूटस्तथा मन्दाकिनी नदी ।
एतत प्रकाशते दूरान्नीलमेघनिभं वनम् ॥8॥

वाटते चित्रकूट हा नदी मन्दाकिनी तशी ।
प्रकाशित मेघासम वन नील पर्वतासम ॥8॥
गिरेः सानूनि रम्याणि चित्रकूटस्य सम्प्रति।
वारणैरवमृद्यन्ते मामकैः पर्वतोपमैः॥9॥
रमणीय सान शिखरां चित्रकूटाच्या गज ।
पर्वतप्राय मम हे उपहासिति ते जणु ॥9॥
मुञ्चन्ति कुसुमान्येते नगाः पर्वतसानुषु ।
नीला इवातपापाये तोयं तोयधरा घनाः॥10॥

वर्षा पुष्पांचि हे वृक्ष ऐसी करति गिरीवरी।
नील मेघ वर्षाकालि करती जलवृष्टि जणू ॥10॥

किंनराचरितं देशं पश्य शत्रुघ्न पर्वते ।
हयैः समन्तादाकीर्णं मकरैरिव सागरम् ॥11॥

पर्वती देख शत्रुघ्ना देश किन्नरवासित ।
अश्वांमुळे दिसे जणु मकरव्याप्त सागर॥11॥

एते मृगगणा भान्ति शीघ्रवेगाः प्रचोदिताः।
वायुप्रविद्धाः शरदि मेघजाला इवाम्बरे ॥12॥

सैन्य पाहुनि पळती वेगे मृग ते शोभती ।
जणु वायुबळे मेघ शरदी नभि वाहती ॥12॥
कुर्वन्ति कुसुमापीडान् सिरःसु सुरभीनमी।
मेघप्रकाशेः फलकैर्दाक्षिणात्या नरा यथा ॥13॥
मेघवर्णी ढालींसह सैनिक वृक्षही तसे ।
पुष्पशोभित दिसती दाक्षिणात्य नरांपरी।
जे शिरी धारण करती पुष्पगुच्छ आभूषणे॥13॥

निष्कूजमिव भूत्वेदं वनं घोरप्रदर्शनम् ।
अयोध्येव जनाकीर्णा सम्प्रति प्रतिभाति मे ॥14॥
निर्जन वन जे वाटे भयंकर येता आपण ।
व्याप्त होउनि जने शोभे अयोध्यानगरी परी ॥14॥
खरैरुदीरितो रेणर्दिवं प्रच्छाद्य तिष्ठति ।
तं बहत्यनिलः शीघ्रं कुर्वन्निव मम प्रिय॥15॥
नभा अश्वचरणधूलि करी आच्छादित जी हवा ।
उडवुनी अन्यत्र करी मज योग्य जे असे ॥15॥

स्यन्दनांस्तुरगोपेतान्‍ सूतमुख्यैरधिष्ठितान्‍ ।
एतान्‍ सम्पततः शीघ्रं पश्य शत्रुघ्न कानने ॥16॥
शत्रुघ्ना वनि जोडूनी रथा अश्व श्रेष्ठ सारथी ।
पहा शीघ्र कैसे जात हाकत असती पुढे ॥16॥
एतान्‍ वित्रासितान्‍ पश्य बर्हिणः प्रियदर्शनान्‍ ।
एवमापततः शैलमधिवासं पतत्त्रिणः ॥17॥
मोर सुन्दर दिसती भयभीत सैनिकांमुळे ।
पहा भये उडणारे इतर पक्षी गिरीकडे ॥17॥

अतिमात्रमयं देशो मनोज्ञः प्रतिभाति मे ।
तापसानां निवासोऽयं व्यक्तं स्वर्गपथोऽनघ ॥18॥

देश मज प्रतित होतो शत्रुघ्ना हा मनोहर ।
स्वर्गीय निवासस्थान तपस्वीजनांचे असे ॥18॥

मृगा मृगीभिःसहिता बहवः पृषता वने ।
मनोज्ञरूपा लक्ष्यन्ते कुसुमैरिव चित्रिताः॥19॥

वनी हरिणींसवे जे मृग ऐसे विहरती ।
दिसती जणु पुष्पांनी चित्रित सुसज्जित ॥19॥

साधु सैन्याः प्रतिष्ठन्तां विचन्वन्तु च काननम् ।
यथा तौ पुरुषव्याघ्रौ दृश्येते रामलक्ष्मणौ ॥20॥
योग्य प्रकारे सैनिक वनी जाउनी शोधती ।
ज्यामुळे पहातिल ते नरव्याघ्रा रामलक्ष्मणा ॥20॥
भरतस्य वचः श्रुत्वा पुरुषः शस्त्रपाणयः।
विविशुस्तद्वनं शूरा धूमाग्रं ददृशुस्ततः॥21॥
ऐकुनी भरतवचा शूरवीर शस्त्रांसह ।
पाहती वनी शिरुनी धूर एका स्थानि तो ॥21॥

ते समालोक्य धूमाग्रमूचुर्भतमागता:।
नामनुष्ये भवत्यग्निर्व्यक्तमत्रैव राघवौ ॥22॥
पाहूनि धूम्र ते येती वदती भरतास असे ।
असे धूम्र तिथे वस्ती इथेच रामलक्ष्मण ॥22॥
अथ नात्र नरव्याघ्रौ राजपुत्रौ परंतपौ
अन्ये रामोपमा: सन्ति व्यक्तमत्र तपस्विन: ॥23॥
जर नरव्याघ्र येथे राम आणि लक्ष्मण।
नसती तर तेजस्वी तपस्वी अन्य असतील ॥23॥

तच्छ्रुत्वा भरतस्तेषां वचनं साधुसम्मतम् ।
सैन्यानुवाच सर्वास्तानमित्रबलमर्दनः॥24॥

वचन श्रेष्ठांस जे मान्य ऐकून भरत तयां।
शत्रुमर्दन सेनेस देतसे आज्ञा अशी ॥24॥

यत्ता भवन्तस्तिष्ठन्तु नेतो गन्तव्यमग्रतः।
अहमेव गमिष्यामि सुमन्त्रो धृतिरेव च ॥25॥

जेथे अहात तेथेच राहा जाऊ नका पुढे ।
मीच जाउन पाहीन सुमन्त्रा धृतिच्यासवे ॥25॥

एवमुक्तास्ततः सैन्यास्तत्र तस्थुः समन्ततः।
भरतो यत्र धूमाग्रं तत्र दृष्टिं समादधत॥26॥
ऐकूनि आज्ञा त्याची राहे सैन्य जागेवरी ।
भरत दृष्टि करी स्थिर धूर जेथुनि निघतसे ॥26॥
व्यवस्थिता या भरतेन सा चमूनिरीक्षमाणापि च भूमिमग्रतः ।
बभूव दृष्टा नचिरेण जानती प्रयस्य रामस्य समागमं तदा ॥27॥
थाम्बविलेले सैन्य भरताने हर्षपूर्वक भूमि निरीक्षत राहतसे उभे।
होती आनन्दित जाणुनीया श्रीरामचन्द्र दिसेल अतिशय लवकर ॥27॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे त्रिनवतित्तमः सर्गः॥93॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 94

दीर्घकालोषितस्तस्मिन् गिरौ गिरिवरप्रियः।
वैदेह्याः प्रियमाकांक्षन् स्वं च चित्तं विलोभयन् ॥1॥
अथ दाशरथिश्चित्रं चित्रकूटदर्शयत ।
भार्याममरसंकाशः शचीमिव पुरंदरः॥2॥
दीर्घकाल वास्तव्ये चित्रकूट श्रीरामा प्रिय।
सीतेस आनंदी करण्या स्वचित्त मनोरंजना ॥1॥

दाखविण्या पर्वत शोभा नेतसे तिज बरोबरी ।
शचीस जैसा इन्द्र पर्वत सुषमा दर्शना ॥2॥

न राज्यभ्रंशनं भद्रे न सुहृद्भिर्विनाभवः।
मनो मे बाधते दृष्ट्वा रमणीयमिमं गिरिम् ॥3॥

रमणीय नग पाहूनी होण्याचे राज्यभ्रष्ट मी।
वियोगाचे सुहृदांच्या दु:ख नच मज जाणवे ॥3॥

पश्येममचलं भद्रे नानाद्विजगणायुतम् ।
शिखरैः खमिविद्धिद्वैर्धातुमद्भिर्विभूषितम् ॥4॥

प्रिये पर्वतावरती पक्षी किलबिलती पहा ।

धातुमण्डित शिखरे गगनचुम्बी शोभती ||4||

केचित रजतसंकाशाः केचित क्षतजसंनिभाः|

पीतमाञ्जिष्ठवर्णाश्च केचिन्मणिवरप्रभाः||5||

पुष्पार्ककेतकाभाश्च केचिज्ज्योतीरसप्रभाः|

विराजन्तेऽचलेन्द्रस्य देशा धातुविभूषिताः||6||

अलंकृत धातूंनी हा रम्य चित्रकूट दिसे|

चमकती चांदीसम ताम्रवर्णी लोहासम ||5||

पीत मन्जिष्ठ वर्णाने मणिश्रेष्ठ काही जणु ।
पुष्कराज जणु काही काही स्फटिक केवडा ।
नानविध प्रकाराने याची शिखरे शोभती ॥6॥

नानामृगगणैर्दीपितरक्ष्वृक्षगणैर्वृत:।
अदुष्टैर्भात्ययं शैलो बहुपक्षिसमाकुल:॥7॥

शोभे हा मृग पक्ष्यांनी व्याघ्र चित्ते अस्वले।
राहती हिंसक प्राणी त्यजुनी दुष्टता सुखे ॥7॥

आम्रजम्ब्वसनैर्लोधै: प्रियालै: पनसैर्धवै:।

अङ्कोलैर्भव्यतिनिशैर्बिल्वतिन्दुकवेणुभिः॥8॥
काश्मर्यारिष्टवरणैर्मधूकैस्तिन्दुकवेणुभिः।
बदर्यामलकैर्नीपैत्रधन्वनबीजकैः॥9॥
पुष्पवद्भिः फलोपेतैश्छायावद्भिर्मनोरमैः।
एवमादिभिराकीर्णःश्रियं पुष्यत्ययं गिरिः॥10॥

लोध असन अन्कोल प्रियाल आम्र जाम्भुळ।
लिंब,आवळा काश्मरी डाळिम्ब बाम्बू बेल धन्वक ॥8॥
भव्य अंकोल तिलक वरण वेत कदम्बही ।

तिनिश तिन्दुक बोर दाट छाया देति जे ॥9॥
फुले फळे बहरता अति मनोरम भासती ।
पर्वत त्या शोभेचा विस्तार पोषण करी ॥10॥

यात अनेक वृक्षांची नावे आहेत ज्याना प्रतिशब्द न सापडल्याने तशीच उद्धृत केली आहेत.

शैलप्रस्थेषु रम्येषु पश्येमान् कामहर्षिणाम् ।
किन्नरान् द्वन्दशो भद्रे रममाणान् मनस्विन:॥11॥

शैलशिखरी प्रदेशा त्या वाढवी प्रेमभावना ।
पहा ज्यामुळे किन्नर युगुले फिरती प्रिये ॥11॥

शाखावसक्तान खड्गांश्च प्रवराण्यम्बराणि च ।
पश्य विद्याधरस्त्रीणां क्रीडोद्देशान मनोरमान ॥12॥

त्यांची वृक्षावरी खड्गे शाखांवरि क्रीडास्थली ।
वस्त्रे सुन्दर स्त्रियांची लटकती तीही पहा ॥12॥

जलप्रपातैरुद्भेदैर्निष्पन्दैश्च क्वचित क्वचित ।
स्रवद्भिर्भात्यायं शैलः स्रवन्मद इव द्विपः॥13॥

उंचावरुनी जलस्त्रोत जमिनीखालुनी तसे।
स्त्रोत छोटे गिरि शोभे मदयुक्त हत्तीसम ॥13॥

गुहासमीरणो गन्धान् नानापुष्पभवान् बहून् ।
घ्राणतर्पणमभ्येत्य कं नरं न प्रहर्षयेत् ॥14॥

गुहातुनि निघे वायु सुगन्धित पुष्पांमुळे ।
वासाने तृप्त होऊन कोण होइ न हर्षित?॥14॥

यदीह शरदोऽनेकास्त्वया सार्धमनिन्दिते ।
लक्ष्मणेन च वत्स्यामि न मां शोकः प्रधर्षति ॥15॥

यास्थली अनेक वर्षे तुझ्यासह लक्ष्मणासह ।
राहता साध्वी सीते शोक नच मज होइल ॥15॥

बहुपुष्पफले रम्ये नानाद्विजगणायते ।
विचित्रशिखरे ह्यस्मिन रतवानस्मि भामिनी ॥16॥

बहु पुष्पे फळे युक्त पक्षी अनेक प्रकारचे ।
युक्त या पर्वतशिखरी मन लागे मम भामिनी ॥16॥

अनेन वनवासेन मम प्राप्तं फलद्वयम ।
पितुश्चानृण्याता धर्मे भरतस्य प्रियं तथा ॥17॥

फळे प्राप्त मला दोन प्रिये वनवासामुळे ।
पितृऋणातुन मुक्त आज्ञा पालन करुनिया ।

भरतास प्रिय मी केले हेहि त्यातुन साधले ॥17॥

वैदेहि रमसे कच्चिच्चित्रकूटे मयासह ।

पश्यन्ती विविधान्‌ भावान्‌ मनोवाक्कायसम्मतान्‌ ॥18॥

तुज आनंद वाटे का वैदेही मजबरोबरी ।

पाहुनी सर्व जे वाणी शरीर मन तुष्टवी ॥18॥

इदमेवामृतं प्राहू राज्ञि राजर्षयः परे।

वनवासं भवार्थाय प्रेत्य मे प्रपितामहा:॥19॥

मानिले अमृतासम या प्रपितामहांनी मम ।
परमकल्याणप्राप्ति पुढील जन्मी होतसे ॥19॥
शिला: शैलस्य शोभन्ते विशाला: शतशोऽभित:।
बहुला बहुलैर्वर्णैर्नीलपीतसितारुणै:॥20॥
चहूबाजूस गिरीच्या विशाल शिला शोभती ।
विविध रंगी लाल पिवळ्या शूभ्र नीलही ॥20॥
निशि भान्त्यचलेन्द्रस्य हुताशनशिखा इव ।
ओषध्य: स्वप्रभालक्ष्म्या भ्राजमाना: सहस्रश:॥21॥

औषधी प्रभासंपत्ती पर्वतराजाच्या शिरी ।
प्रकाशित होउनीया चमके अग्निशिखेसम॥21॥
केचित क्षयनिभा देशाः केचिदुद्यानसंनिभाः।
केचिदेकशिला भान्ति पर्वतस्यास्य भामिनि ॥22॥
गृहासम काही स्थाने काही उद्यानासम ।
काही एक प्रचंड शिला ऐसे विविध शोभत ॥22॥
भित्वेव वसुधां भाति चित्रकूट समुत्थितः।
चित्रकूटस्य कूटोऽयं दृश्यते सर्वतः शुभः॥23॥

भेदुनी पृथ्वीस वरी उपस्थित जणु हा गिरी ।
सर्वबाजूनि दिसे रम्य चित्रकूट शिखर हे ॥23॥
कुष्ठस्थगरपुंनागभूर्जपत्रोत्तरच्छदान् ।
कामिनां स्वास्तरान् पश्य कुशेशयदलायुतान् ॥24॥
विलासि शयनासाठी शय्या आच्छादलेली जी।
पुन्नाग भूर्जपत्रांनी कमलपत्रेहि त्यावरी ॥24॥
मुदिताश्चापविद्धाश्च दृश्यान्ते कमलस्रजः।
कामिभिर्वनिते पश्य फलानि विविधानि च ॥25॥

कमलमाला विलासींनी कुस्करुनि या फेकल्या ।
तैशी नानाप्रकाराची फळे वृक्षांवर पहा ॥25॥

वस्वौकसारां नलिनीमतीत्यैवोत्त्रान कुरून ।
पर्वतश्चित्रकूटोऽसौ बहुमूलफलोदक:॥26॥

फल मूल जल संपन्न अलकापुरीस लाजवी ।
पर्वत हा स्वशोभेने उत्तर कुरु देशासही ॥26॥

इमं तु कालं वनिते विजहिवांस्त्वया च सीते सह लक्ष्मणेन ।
रतिं प्रपत्स्ये कुलधर्मवर्धिनी सतां पथि स्वैर्नियमै: परै: स्थित: ॥27॥

**करीत उत्तम नियमपालन सन्मार्गस्थित लक्ष्मणा तुझ्यासवे।**
**व्यतीत सानन्द येथील काल सुखास प्राप्त कुलधर्म वाढवी ॥27॥**

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुर्नवतितमः सर्गः॥94॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 95

अथ शैलाद् विनिष्क्रम्य मैथिली कोसलेशरः।
अदर्शयच्छुभजलां रम्यां मन्दाकिनीम नदीम ॥1॥
पर्वत ओलांडुन जाता मैथिलीस कोसलेश्वर ।
पुण्यसलिला घडवी मन्दाकिनीचे दर्शन ॥1॥
अब्रवीच्च वरोराहां चन्द्रचारुनिभाननाम ।
विदेहराजस्य सुतां रामो राजीवलोचनः॥2॥

चन्द्रचारु वदना सीता विदेहराज सुता ।
राजीवलोचन श्रीराम तिला ऐसे म्हणतसे ॥2॥

विचित्रपुलिनां रम्यां हंससारससेविताम् ।
कुसुमैरुपसम्पन्नां पश्य मन्दाकिनीं नदीम् ॥3॥

मन्दाकिनि नदी पाही हंससारस सेवित ।
किनारा तिचा शोभे नाना पुष्पांमुळे पहा ॥3॥

नानाविधैस्तीररुहैर्वृतां पुष्पफलद्रुमैः।
राजन्ती राजराजस्य नलिनीमिव सर्वतः॥4॥

फलफूले बहरलेल्या तटवर्ती वृक्षांमुळे।
शोभे मन्दाकिनी जैसे कुबेर सरोवर ॥4॥

मृगयूथनिपीतानि कलुषाम्भासि साम्प्रतम ।
तीर्थानि रमणीयानि रतिं संजनयन्ति मे ॥5॥

मृगांनी पिउनी पाणी जरी गढूळ केले असे ।
तरी घाट रमणीय आनंद देति मना मम ॥5॥

जटाजिनधराः काले वल्कलोत्तरवाससः।
ऋष्यस्त्ववगाहन्ते नदीं मन्दाकिमीं प्रिये ॥6॥

ऋषि जटाजिनधर वल्कलोतरीय धारुनी ।
येउनी करिती स्नान मन्दाकिनी नदीमध्ये ॥6॥

आदित्यमुपतिष्ठन्ते नियमादूर्ध्ववाहवः।
एते परे विशालाक्षि मुनयः संशितव्रताः॥7॥

मुनि हे नित्यनियमे कठोर व्रत पाळण्या ।
उंचावुन दोन्ही हात सूर्यदेवा उपासती ॥7॥

मारुतोद्धूतशिखरैः प्रनृत्त इव पर्वतः।
पादपैः पुष्पपत्राणि सृजद्भिरभितो नदीम् ॥8॥

वृक्ष गाळिति फुले पाने तटावरती हालुनी ।
कम्पे त्यांच्या दिसे जणू नृत्य करितो पर्वत॥8॥
क्वचिन्मणिनिकाशोदां क्वचित पुलिनशालिनीम ।
क्वचित सुद्धजनाकीर्णां पश्य मन्दाकिनी नदीम ॥9॥
दिसते मोत्यासमान कोठे जल स्वच्छ हिचे ।
उंच किनाऱ्यामुळे नसे दिसत जल कुठे ।
कुठे व्याप्त सिद्धजने अवगाहिति जेथे तिला ॥9॥

निर्धूतान्‌ वायुना पश्य विततान्‌ पुष्पसंचयान्‌ ।
पोप्लूयमानानपरान्‌ पश्य त्वं तनुमध्यमे ॥10॥

वायुने उडवलेले पुष्पभार नदीतिरी ।
हे सूक्ष्मकटि ते देख तरती पाण्यावरी ॥10॥

पशैतदल्गुवचसो रथाङ्गाह्वयना द्विजाः।
अधिरोहन्ति कल्याणि निष्कूजन्त्‌ः शुभा गिर्‌ः॥11॥

कल्याणि मधुर करती चक्रवाक कलरव ।
कश्याप्रकारे होती नदीतटावरि आरुढ ॥11॥

दर्शनं चित्रकूटस्य मन्दाकिन्याश्च शोभने।
अधिकंपुरवासच्च मन्ये तव दर्शना ॥12॥

दर्शन इथे प्रतिदिनि चित्रकूट मन्दाकिनी।
तसे शोभने तुझेही अयोध्येहुन मी सुखी12॥

विधूतकल्मषैः सिद्धैस्तपोदशमान्वितैः।
नित्यविक्षोभितजलां विगाहस्व मया सह ॥13॥

तपस्वी निग्रही सिद्ध करती स्नान त्यामुळे।
विशुद्ध जल यामध्ये करी स्नान मजसवे ॥13॥

सखीवच्च विगाहस्य सीते मन्दाकिनी नदीम् ।
कमलान्यवमज्जयन्ती पुष्कराणि च भामिनि ॥14॥

सखीसम जलक्रीडा कर मन्दाकिनीमध्ये।
लाल श्वेत पद्मपुष्पा बुडवुनी जलामध्ये ॥14॥

त्वं पौरजनवद् व्यालानयोध्यामिव पर्वतम् ।
मन्यस्व वनिते नित्यं सरयूवदिमां नदीम् ॥15॥

मान वनवासीं पुरवासी अयोध्या चित्रकूटास ।
मानुनी मन्दाकिनीस सरयू नदीच जणु ॥15॥

लक्ष्मणश्चैव धर्मात्मा मन्निदेशे व्यवस्थित:।
त्वं चानुकूला वैदेहि प्रीतिं जनयती मम ॥16॥
लक्ष्मण आज्ञाकारी तूहि सदैव अनुकूल ।
त्यामुळे वैदेही सदा अतिप्रसन्न मी असे ॥16॥
उपस्पृशंस्त्रिषवणं ,अधुमूलफलाशन:।
नायोध्याये न राज्याय स्पृहये च त्वया सह ॥17॥
तुजसवे त्रिकाल स्नान आहार मधुर फलमूल।
त्यामुळे न इच्छी जाण्या अयोध्या राज्यही तसे॥17॥

इमां हि रम्यां गजयूथलोडितां निपीततोयां गजसिंहवानरैः।

सुपुष्पितां पुष्पभरैरलंकृतां न सोऽस्ति यः स्यान्न गतक्लमः सखी॥18॥

जिच्यात गजसमूह शुंड बुडविती पिती जल जिचे गज सिंह वानर

सुपुष्पित वृक्ष जिच्यातिरी मन्दाकिनि स्नाने आनंदित सर्व जन॥18॥

इतीव रामो बहुसंगतं वचः प्रियासहायःसरितं प्रति ब्रुवन्।

चचार रम्यं नयनाञ्जनप्रभं स चित्रकूटं रघुवंशवर्धनः॥19॥

मन्दाकिनी नदीविषयी बोल बोलत चित्रकूटावरी।

विहार करण्यास सखी सीतेसवे श्रीराम रघुवंशवर्धन ॥19॥

**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे पञ्चनवतितमः सर्गः॥95॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 96

तां तदा दर्शयित्वा तु मैथिली गिरिनिम्नगाम् ।
निषसाद गिरिप्रस्थे सीतां मांसेन छन्दयन् ॥1॥

मन्दाकिनीचे दर्शन घडवून मैथिलीस ।
गिरिस्थानी फल मूल देत संतोषवी तिला ॥1॥

इदंमेध्यमिदं स्वादु निष्टप्तमिदमग्निना ।
एवमास्ते स धर्मात्मा सीतया सह राघवः ॥2॥

फळे स्वादिष्ट आहेत कंद उत्तम भाजले ।
सांगे सीतेस धर्मात्मा श्रीराम पुरुषोत्तम ॥2॥
तथा तत्रासतस्तस्य भरतस्योपयायिन:।
सैन्यरेणुश्च शब्दश्च प्रादुरास्तां नभस्पृशौ ॥3॥
त्याच वेळी दिसे धूळ आकाशी उडता तयां ।
भरतसेना आगमने कोलाहल त्याच्यासवे ॥3॥
एतस्मिन्नंतरे त्रस्ता: शब्देन महता तत:।
अर्दिता यूथपा मत्ता: सयूथाद् दुद्रुवुर्दिश:॥4॥

तीव्र ध्वनि ऐकून गज भयभीत पीडित ।
थवे नेत्यासह त्यांच्या सर्वत्र पळु लागती ॥4॥
स तं सैन्यसमुद्भूतं शब्दं शुश्राव राघवः।
तांश्च विप्रद्रुतान् सर्वान् यूथपानन्ववैक्षत ॥5॥
ऐके श्रीराम सैन्याचा कोलाहल उत्पन्न जो।
गजपती पळती तेही दृष्टीस त्याच्या पडे ॥5॥
तांश्च विप्रद्रुतान् दृष्ट्वा तं च श्रुत्वा महास्वनम् ।
उवाच रामः सौमित्रिं लक्ष्मणं दीप्ततेजसम् ॥6॥

पाहुनी धावती हत्ती कोलाहल भयंकर ।
ऐकुनी श्रीराम तेजस्वी लक्ष्मणास असे म्हणे ॥6॥

हन्त लक्ष्मण पश्येह सुमित्रा सुप्रजास्त्वया ।
भीमस्तनितगम्भीरं तुमुल: श्रूयते स्वन:॥7॥

तुजमुळेच सौमित्रा सुमित्रा श्रेष्ठ पुत्रजा ।
पहा भयंकर नाद कोठुनी ऐकु येतसे ॥7॥

गजयूथानि वारण्ये महिषा वा महावने ।
वित्रासिता मृगा: सिंहै: सहसा प्रद्रुता दिश:॥8॥

राजा वा राजपुत्रो वा मृगयामटते वने ।
अन्यद्वा श्वापदं किंचित सौमित्रे ज्ञातुमर्हसि॥9॥

विशाल वनि या हत्ती महिषी मृग यांचे थवे ।
पळता दिसति सर्वत्र सिंहभये तर नव्हे?॥8॥

किंवा राजपुत्र वा राजा वनात मृगयेस्तव।
येतसे वा श्वापद अन्य दिसे का लक्ष्मणा पहा॥9॥

सुदुश्चरो गिरिश्चायं पक्षिणामपि लक्ष्मण ।
सर्वमेतद् यथातत्त्वमभिज्ञातुमिहार्हसि ॥10॥

अपरिचित पक्ष्यांनाही दुर्गम हा पर्वत ।
तरी काय घडे याचा लक्ष्मणा नीट शोध घे ।।10।।

स लक्ष्मणः संत्वरितः सालमारुह्य पुष्पितम् ।
प्रेक्ष्यमाणो दिशः सर्वाः पूर्वां दिशमवैक्षत ।।11।।

आज्ञेने रामाच्या त्वरे चढुनी पुष्पित ।
शालवृक्षावरी पाही पूर्वेकडे लक्ष्मण ।।11।।

उदङ्मुखः प्रेक्षमाणो ददर्श महतीं चमूम् ।
गजाश्वरथसम्बाधां यत्तेर्युक्तां पदातिभिः ।।12।।

उत्तर दिशेस त्यास विशाल सेना दिसे ।

गज,अश्व रथे पूर्ण पायदळ सैन्य तसे ॥12॥

तामश्वरथसम्पूर्णा रथध्वजविभूषिताम् ।

शशंस सेनां रामाय वचनं चेदमब्रवीत ॥13॥

अश्वरथयुक्त पूर्ण ध्वजविभूषित सेना।

आल्याची सूचना रामा देउनि तो वदे ॥13॥

अग्नि संशमयत्वार्य: सीता च भजतां गुहाम् ।

सज्यं कुरुष्व चापं च शरांश्च कवचं तथा ॥14॥

अग्नि विझवुनी आर्य सीतेस गुहेत पाठवा ।
कवच धारुनी सज्ज चाप धनुष्यासी करा ॥14॥
तं रामः पुरुषव्याघ्रो लक्ष्मणं प्रत्युवाच ह ।
अङ्गावेक्षस्व सौमित्रे कस्येमां मन्यसे चमूम् ॥15॥
पुरुषव्याघ्र श्रीराम सांगे व्यवस्थित पहा ।
लक्ष्मणा वाटते काय कुणाची सेना ही असे ॥15॥
एवमुक्तस्तु रामेण लक्ष्मणो वाक्यमब्रवीत ।
दिधक्षन्निव तां सेनां रूषितः पावको यथा ॥16॥

ऐकुनि लक्ष्मण रोषे सेनेकडे दृष्टि टाके अशी ॥
की वाटे जाळुनी भस्म करणार मग बोलतो ॥16॥
संपन्नं राज्यमिच्छंस्तु व्यक्तं प्राप्याभिषेचनम् ।
आवां हन्तु समभ्येति कैकेय्या भरत: सुत"॥17॥
कैकेयीपुत्र हा भरत अभिषिक्त होउनि येतसे ।
राज्य निष्कंटक करण्या वधुनी उभया आम्हा ॥17॥
एष वै सुमहान् श्रीमान् विटपी सम्प्रकाशते ।
विराजत्युज्ज्वलस्कंध: कोविदारध्वजो रथे ॥18॥

वृक्ष जो शोभासंपन्न रथ त्याजवळी असे ।
कोविदार वृक्ष चिह्न युक्त ध्वज त्यावरि असे ॥18॥
भजन्त्येते यथाकाममश्वानारुह्य शीघ्रगान् ।
एते भ्राजन्ति संहृष्टा गजानारुह्य सादिनः ॥19॥
घोडेस्वार अश्वावरी गजाती गजावरि तसे ।
आरूढ होवोनि हर्षे येति होत प्रकाशित ॥19॥
गृहीतधनुषावावां गिरिं वीर श्रयावहे ।
अथवेहैव तिष्ठावः संनद्धावुद्यतायुधौ ॥20॥

आम्हा दोघांस धनुष्य धारुनी पर्वतावरी ।
किंवा कवच बांधूनि इथेच राहणे सज्ज ॥20॥

अपि नौ वशमागच्छेत् कोविदारध्वजो रणे ।
अपि द्रक्ष्यामि भरतं यत्कृते व्यसनं महत् ॥21॥
त्वया राघव सम्प्राप्तं सीतया च मया तथा ।
अन्निमित्तं भवान् राज्याच्च्युतो राघव शाश्वतात् ॥22॥

कोविदार चिन्हयुक्त रथ आम्हां दोघांस दिसे ।
भरतास आम्ही पाहू ज्याकारणे संकटात या ॥21॥

राघवा तू सीतेसह मीही पडलो असूं ।
राज्यापासुनि वञ्चित तूही झालेला असे ॥22॥
सम्प्राप्तोऽयमरिर्वीर भरतो वध्य एव हि ।
भरतस्य वधे दोषं नाहं पश्यामि राघव ॥23॥
आम्हापुढे भरत असे शत्रु वधाया योग्य हा।
वधण्यात तया दोष वाटे मज काही नसे ॥23॥
पूर्वापकारिणं हत्वा न ह्यधर्मेण युज्यते।
पूर्वापकारी भरतस्त्यागेऽधर्मश्च राघव ॥24॥

अपकार ज्याने केला त्या वधणे अधर्म नसे ।
अपकारी भरतास जिवित सोडणे अधर्म हा ॥24॥

एतस्मिन् निहते कृत्स्नामनुशाधि वसुंधराम् ।
अद्य पुत्रं हतं संख्ये कैकेयी राज्याकामुका ॥25॥
मया पश्येत् सुदु :खार्ता हस्तिभिन्नमिव द्रुमम् ।

मारुनि यास समस्त वसुधेस शासन करू ।
वृक्षा गज तोडि तैसा राज्यालोभि कैकेयीस ॥25॥
माझ्याकडुन भरतास युद्धे मरता पाहुदे ।

कैकेयीं च वधिष्यामि सानुबन्धां सबान्धवाम् ॥26॥
कलुषेणाद्य महता मेदिनी परिमुच्यताम् ।
वधीन कैकेयीस मी तिच्या बान्धवांसह ॥26॥
ज्यामुळे पृथ्वी मुक्त महान पापातुनी ॥
अद्येमं संयतं क्रोधमसत्कारं च मानद ॥27॥
मोक्ष्यामि शत्रुसैन्येषु कक्षेष्विव हुताशनम् ।
क्रोध संताप उतरेन शत्रुसैन्यावरी असा ॥27॥
जणु गवताच्या गंजीस लागली आगचि असे ॥

अद्यैव चित्रकूटस्य काननं निशितैः शरैः।।।28।।

छिन्दन शत्रुशरीराणि करिष्ये शोणितोक्षितम् ।

शरांनी तीक्ष्ण या माझ्या शत्रुचे देह छिन्दुनी ।।28।।

वनी या चित्रकूटाच्या करीन रक्तसिंचन ।

शरैर्निर्भिन्नहृदयान् कुञ्जरांस्तुरगांस्तर्हा ।।29।।

श्वापदाः परिकर्षन्तु नरांश्च निहतान् मया ।

गज अश्व सैनिकही वधिन ज्यांना मी रणी ।।29।।

गिधाडे पशुही त्यांच्या मृत देहांस नेतिल ।

शराणां धनुषश्चाहमनृणोऽस्मिन महावने।

ससैन्यं भरतं हत्वा भविष्यामि न संशय: ॥30॥

ऋणमुक्त होइन मी शरधनुष्याच्या मम।

वधुनी सेनासहित भरता वनि नि:संशय॥30॥

भाषान्तरकाराचे मत

भरताप्रति जो राग लक्ष्मण प्रकट करी।

अवाजवी वाटे तो बन्धु त्याचा त्यावरी ॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे षण्णतितम: सर्ग: ॥96॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 97

सुसंरब्धं तु भरतं लक्ष्मणं क्रोधमूर्च्छितम् ।
रामस्तु परिसान्त्व्याथ वचनं चेदमब्रवीत ॥1॥

भरतावरील क्रोधे विवेक सोडे लक्ष्मण ।
समजावूनि श्रीराम त्या शान्त करुनी वदे ॥1॥

किमत्र धनुषा कार्यमसिना वा सचर्मणा।
महाबले महोत्साहे भरते स्वयमागते ॥2॥

येता भरत उत्साही स्वत: येथ महाबलि।
धनुष्य तथा अस्त्रांचे काय काम तिथे असे ॥2॥

पितु: सत्यं प्रतिश्रुत्य हत्वा भरतमाहवे ।
किं करिष्यामि राज्येन सापवादेन लक्ष्मण ॥3॥

पित्याचे वचन सत्य करण्या येऊन वनी ।
भरता मारुनी राज्य कलंकित का घेउ मी ॥3॥

यद् द्रव्यं बान्धवानां वा मित्राणां वा क्षये भवेत ।
नाहं तत प्रतिगृह्णीयां भक्ष्यान विष्कृतानिव ॥4॥

मित्र वा बान्धवांना जे द्रव्य मारुनि मिळे ।
विषयुक्त अन्नासम त्याज्य कधी न स्वीकारिन ॥4॥
धर्ममर्थंच कामं च पृथिवीं चापि लक्ष्मण।
इच्छामि भवतामर्थे एतत प्रतिश्रुणोमि ते ॥5॥
धर्म अर्थ काम राज्य पृथ्वीचे मज तुम्हास्तव ।
इच्छितो मी लक्ष्मणा हे प्रतिज्ञेवर सांगतो ॥5॥
भ्रातृणां संग्रहार्थं च सुखार्थं चापि लक्ष्मण ।
राज्यमप्यहनिच्छामि सत्येनायुधमालभे ॥6॥

प्रेम आणि सुख बन्धूंचे राज्य यास्तव इच्छितो ।
धनुष्याची शपथ घेतो सत्य तथ्य हेच असे ॥6॥

नेयं मम मही सौम्य दुर्लभा सागराम्बरा ।
नहीच्छेयमधर्मेण शर्त्वमपि लक्ष्मण ॥7॥

सागरावेष्टित पृथ्वी नसे दुर्लभ ती मला ।
अधर्मे इन्द्रपदही मिळवणे नच इच्छितो ॥7॥

यद् विना भरतं त्वां च शत्रुघ्नं वापि मानद ।
भवेन्मम सुखं किंचिद् भस्म तत कुरुतां शिखी ॥8॥

तुम्हा तिघांविण सुख कोणतेही जर मिळे।
तर करो तया भस्म अग्निदेव जाळूनिया ॥8॥

मन्येऽहमागतोऽयोध्यां भरतो भ्रातृवत्सलः ।
मम प्राणैः प्रियतरः कुलधर्ममनुस्मरन् ॥9॥
श्रुत्वा प्रव्राजितं मां हि जटावल्कलधारिणम् ।
जानक्या सहितं वीर त्वया च पुरुषोत्तम ॥10॥
स्नेहेनाक्रान्तहृदयः शोकेनाकुलितेन्द्रियः।
द्रष्टमभ्यागतो ह्येष भरतो नान्यथाऽऽगतः॥11॥

वाटते अयोध्येहून भरत भ्रातृवत्सल ।
प्राणप्रिय मज येई कुलधर्म अनुसरुनी ॥9॥
ऐकुनी जटावल्कल धारुनी वनी मी येतसे।
जानकीसह वीरा तुझ्यासह पुरुषोत्तमा ॥10॥
प्रेमाने हृदय आक्रन्दे शोके व्याकुल इन्द्रिये ।
भेटण्या येतसे आम्हा अन्य हेतु नसे तया ॥11॥
अम्बा च कैकयीं रुष्य भरतश्चाप्रियं वदन् ।
प्रसाद्य पितरं श्रीमान् राज्यं मे दातुमागत:॥12॥

कोपुनि कैकयी माते कठोर वच बोलुनी ।
पित्या सांगुनि मज राज्य देण्या भरत येतसे ॥12॥

प्राप्तकालं यथैषोऽस्मान भरतो द्रष्टमर्हति।
अस्मासु मनसाप्येष नाहितं किंचिदाचरेत ॥13॥

भरतागमन असे योग्य समयोचित भेटण्या ।
अहित करण्याचा न करे विचारही भरत ॥13॥

विप्रियं कृतपूर्वं ते भरतेन कदा नु किम ।
ईदृशं वा भयं तेऽद्य भरतं यद् विशङ्कसे ॥14॥

अयोग्य वर्तन कधी भरताने केले असे ।

की तुला भय वाटावे शङ्का आज घेशी अशी ॥14॥

नहि ते निष्ठरं वाच्यो भरतो नाप्रियं वचः।

अहं ह्यप्रियमुक्तः स्यां भरतस्याप्रिये कृते ॥15॥

नको बोलु भरतास कठोर अप्रिय बोल तू ।

करसी तसे तर तू समजेन माझ्याप्रति ॥15॥

कथं नु पुत्राः पितरं हन्युः कस्यांचिदापदि।

भ्राता वा भ्रातरं हन्यात सौमित्रे प्राणमात्मनः॥16॥

पित्या पुत्र वधी कैसा आपत्ति ये मोठी जरी ।
वा बन्धु प्राणासमान बन्धूस आपल्या वधी ॥16॥
यदि राज्यस्य हेतोस्त्वमिमां वाचं प्रभाषसे ।
वक्ष्यामि भरतं दृष्ट्वा राज्यमस्मै प्रदीयताम् ॥17॥
राज्याविषयी कठोर शब्द ऐसे जर बोलसी।
भरता भेटता सांगेन राज्य तू लक्ष्मणास दे॥17॥
उच्चमानो हि भरतो मया लक्ष्मण तद्वचः।
राज्यमस्मै प्रयच्छेति बाढमित्येव मंस्यत्र ॥18॥

उच्चारता असे बोल भरतास मी लक्ष्मणा।

तत्काळ तो मानेल बोललो त्याला जसे ॥18॥

तथोक्तो धर्मशीलेन भ्राता तस्य हिते रत:।

लक्ष्मण: प्रविवेशेव स्वानि गात्राणि लज्जया॥19॥

धर्मपरायण बन्धू बोलता हिततत्पर ।

लज्जेने खालती मान घाली लक्ष्मण तेधवा ॥19॥

तद्वाक्यं लक्ष्मण: श्रुत्वा व्रीडित: प्रत्युवाच ह ॥

त्वां मन्ये द्रष्टमायात: पिता दशरथ: स्वयम् ॥20॥

वचन ऐकुनि रामाचे बोले लज्जित लक्ष्मण।
वाटे मज महाराज दशरथ येती भेटण्या ॥20॥
व्रीडितंलक्ष्मणं दृष्ट्वा राघवः प्रत्युवाच ह ।
एष मन्ये महाबाहुरिहास्मान्‍ द्रष्टमागतः॥21॥
लक्ष्मणा तसे पाहून श्रीराम त्यास उत्तरे ।
मलाही वाटते येती महाबाहु भेटण्यास्तव ॥21॥
अथवा नौ ध्रुवं मन्ये मन्यमानः सुखोचितौ ।
वनवासमनुध्याय गृहाय प्रतिनेष्यति ॥22॥

सुख भोगण्या योग्य समजुनी आपणास ते ।
वाटते निश्चित गृही परत नेण्या येति ते ॥22॥

इमां चाप्येष वैदेहीमत्यन्तसुखसेविनीम् ।
पिता मे राघव: श्रीमान् वनादादाय यास्यति ॥23॥

सुखे अत्यन्त राही जी वैदेही तिज घेउनी ।
पिता मम दशरथ जाती अयोध्येस गृही ॥23॥

एतो तौ सम्प्रकाशेते गोत्रवन्तौ मनोरमौ।
वायुवेगसमौ वीरौ जवनौ तुरगोत्तमौ ॥24॥

उत्तम अश्वकुले जन्म घेउनि वायुवेग ज्या।
शीघ्रगामी मनोरम अश्व उत्तम चमकती ॥24॥

स एष सुमहाकाय: कम्पते वाहिनीमुखे।
नाग: शत्रुजयो नाम वृद्धस्तातस्य धीमत:॥25॥

तोच हा विशालकाय बुद्धिमान पित्याचा जो
वृद्ध शत्रुजय गज सेनेच्या पुढति चालत ॥25॥

न तु पश्यामि तच्छत्रं पाण्डुरं लोकविश्रुतम्।
पितुर्दिव्यं महाभाग संशयो भवतीह मे ॥26॥

परि न दिसतो दिव्य श्वेतछत्र जनविश्रुत ।
संशय त्यामुळे येतो महाभागा मनी मम ॥26॥

वृक्षायादवरोह त्वं कुरु लक्ष्मण मद्वचः।
इतीव रामो धर्मात्मा सौमित्रिं तमुवाच ह ॥27॥

अवतीर्य तु सालानात तस्मात स समितिंजयः ।
लक्ष्मणः प्राञ्जलिर्भूत्वा तस्थौ रामस्य पार्श्वतः ॥28॥

मान वच हे माझे उतरी वृक्षावरुनी ।
ऐसे धर्मात्मा श्रीराम सौमित्रीस वदतसे ॥27॥

ऐकोनि लक्ष्मण शाल वृक्षावरुनी खालती ।
उतरून रामामागे उभा हात जोडुनी ॥28॥
भरतेनाथ संदिष्टा सम्मर्दो न भवेदिति।
समन्तात तस्य शैलस्य सेना वासमकल्पयत ॥29॥
भरत सेनेस आज्ञापी न बाधा कोणासही ।
करा येथे म्हणता सैन्य पर्वताखाली थांबले ॥29॥
अध्यर्धमिक्ष्वाकुचमूर्योजनं पर्वतस्य ह ।
पाएवे न्यविशदावृत्य गजवाजिद्रराकुला ॥30॥

सेना इक्ष्वाकुवंशी राजाची गज अश्व सैमिकासह ।
पर्वातास योजने दीड वेढा घालुनि रहातसे ॥30॥
सा चित्रकूटे भरतेन सेना धर्मं पुरस्कृत्य विध्य दर्पम् ।
प्रसादनार्थं रघुनन्दनस्य विरोचते नीतिमता प्रणीता ॥31॥
त्या चित्रकुटे त्यागुनी गर्व सेना जी प्रसन्न करण्या श्रीरामास ।
धर्माचा विचार करुनी आणलि चित्रकूटाखाली शोभतसे बहू ती ॥31॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तनवतितमः सर्गः ॥97॥

# अयोध्याकाण्ड सर्ग 98

निवेश्य सेनां तु विभुः पद्भ्यां पादवतां वरः।
अभिगन्तुं स काकुत्स्थमियेष गुरुवर्तकम् ॥1॥
निविषमात्रे सैन्ये तु यथोद्देशं विनीतवत् ।
भरतो भ्रातरं वाक्यं शत्रुघ्नमिदमब्रवत् ॥2॥
खालती सोडुनी सेना विचार भरत करी ।
जाण्याचा श्रीरामाप्रत गुरुसेवापरायण ॥1॥

आपुल्या जागी सेना विनम्रभावे स्थित ।
तेव्हां भरत बंधूस शत्रुघ्ना वच बोलला ॥2॥

क्षिप्रं वनमिदं सौम्यं नरसंघैः समन्ततः।
लुब्धेश्च सहितैरेभिस्त्वमन्वेषितुमर्हसि ॥3॥

हे सौम्य घेउनि शीघ्र निषादांसह बहु जनां ।
करी श्रीरामचन्द्रांचा सर्वत्र शोध वनी त्वरे ॥3॥

गुहो ज्ञातिसहस्रेण शरचापाशिपाणिना ।
समन्वयेषु काकुत्स्थावस्मिन्‍ परिवृतः स्वयम्‍ ॥4॥

गुह घेउनिया शस्त्रे सहस्त्र बांधवांसवे ।
घेवो जाउनिया शोध राम लक्ष्मण काकुस्थ॥4॥

अमात्यैः सह पौरेश्च गुरुभिश्च द्विजातिभिः।
सह सर्व चरिष्यामि पद्भ्यां परिवृतः स्वयम् ॥5॥

मन्त्री गुरुजन पौर ब्राह्मणांसह मी स्वतः ।
फिरेन वनात पायी श्रीरामा शोधण्यास्तव ॥5॥

यावन्न रामं द्रक्ष्यामि लक्ष्मणं महाबलम् ।
वैदेही वा महाभागां न मे शान्तिर्भविष्यति ॥6॥

जोवरी नच पाहीन राम लक्ष्मण महाबली ।
वैदेहीस महाभागा नच शान्ति मिळे मला ॥6॥

यावन्न चन्द्रसंकाशं तद् द्रक्ष्यामि शुभाननम् ।
भ्रान्तः पद्मविशालाक्षं न मे शान्तिर्भविष्यति ॥7॥

पद्मासम विशाल नेत्र मुखचन्द्राचे दर्शन ।
जोवरी नच होईल शान्ति नच मिळे मला ॥7॥

सिद्धार्थः खलु सौमित्रिर्यश्चंद्रविमलोपमम् ।
मुखं पश्यति रामस्य राजीवाक्षं महाद्युतिम् ॥8॥

लक्ष्मण खरोखर धन्य चन्दासम तेजस्वी मुख ।
कमलाक्ष आह्लादक निरंतर होतसे तया ॥8॥

यावन्न चरणौ भ्रातु: पार्थिवव्यञ्जनान्वितौ ।
शिरसा प्रग्रहीष्यामि न मे शान्तिर्भविष्यति ॥9॥

राजलक्षण युक्त पदी जोवरी शिर न ठेवित ।
बन्धु श्रीरामाच्या तोवरी शान्ति ना मज ।9॥

यावन्न राज्ये राज्यार्ह: पितृपैतामहे स्थित:।
अभिषिक्तो जलक्लिन्नो न मे शान्तिर्भविष्यति ॥10॥

जोवरी खरा अधिकारी पिता पितामह राज्याचा ।
प्रतिष्ठित अभिषेकजले तोवर शान्ति नसे मला ॥10॥

कृतकृत्या महाभागा वैदेही जनकात्मजा ।
भर्तारं सागान्ताया पृथिव्या यानुगच्छति॥11॥

श्रीरामा पतीस स्वामी पृथ्वीचा जनकात्मजा ।
सत्कर्मे अनुसरुनी कृतार्था ती होतसे ॥11॥

सुशुभश्चित्रकूटोऽसि गिरिराजसमो गिरिः।
यस्मिन् वसति काकुत्स्थः कुबेर इव नन्दने ॥12॥

चित्रकूट सुमङ्गल गिरिराजासम गिरी ।
श्रीराम वसती जैसे कुबेर नन्दनवनी ॥12॥

कृतकार्यमिदं दुर्गवनं व्यालनिषेवितम् ।
यदध्यास्ते महाराजो रामः शस्त्रभृतां वरः॥13॥

सर्पसेवित दुर्गम हे वनही कृतार्थ जिथे ।
शस्त्राधारीमध्ये श्रेष्ठ श्रीराम निवास करी ॥13॥

एवमुक्त्वा महाबाहुर्भरतः पुरुषर्षभः।
पद्भ्यामेव महातेजाः प्रतिवेश महद्वनम् ॥14॥

ऐसा वदता भरत महाबाहु पुरुषर्षभ ।
करी विशाल वनात प्रवेश पदे चालत ॥14॥

स तानि द्रुमजालानि जातानि गिरिसानुषु ।
पुष्पिताग्राणि मध्येन जगाम वदतां वरः ॥15॥

पर्वतशिखरी उत्पन्न पुष्पाच्छादित वृक्ष जे।
अग्रभागि असति त्यांच्या समुहातून तो निघे ॥15॥

स गिरेश्चित्रकूटस्य सालमारुह्य सत्वरम् ।
रामाश्रमगतस्याग्नेर्ददर्श ध्वजमुच्छ्रितम् ॥16॥

चित्रकूटावरी शाल वृक्षावर चढुनी त्वरे ।
पाही निघता धूर रामाच्या आश्रमातुनी ॥16॥
तं दृष्ट्वा भरतः श्रीमान् मुमोद सहबान्धवः।
अत्र राम इति ज्ञात्वा गतः पारमिवाम्भसा ॥17॥
पाहुनी त्या श्रीमान् भरत शत्रुघ्नासह ।
इथे राम जाणूनि पार हो जणु जलाशय॥17॥
स चित्रकूटे तु गिरौ निशम्य रामाश्रमं पुण्यजनोपपन्नम् ।
गुहेन सार्धं त्वरितो जगाम पुनर्निवेश्यैव चमूं महात्मा ॥18॥

त्या चित्रकूटावरि पाहुनीया श्रीराम आश्रम निर्मित पुण्यजने जो ।
सेना पुन:स्थापुनि पूर्वस्थानी जाई गुहासह भरत आश्रमाकडे ॥18॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टनवतितमः सर्गः॥98॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 99

निविष्टायां तु सेनायामुत्सुको भरतस्ततः:।
जगाम भ्रातरं द्रष्टं शत्रुघ्नमनुदर्शयन ॥1॥
सेना स्थापुनी उत्सुक भरत बन्धु दर्शना ।
आश्रम दावि शत्रुघ्ना त्याच्यासवे जाई तिथे ॥1॥
ऋषिं वसिष्ठं संदिश्य मातृर्मे शीघ्रमानय:।
इति त्वरितमग्रे स जगाम गुरुवत्सल:॥2॥

शीघ्र मातेस मम आणा वसिष्ठां सांगुनी असे ।
त्वरेने जाई पुढती भरत गुरुवत्सल ॥2॥
सुमन्त्रस्त्वपि शत्रुघ्नमदूरादन्वपद्यत ।
रामदर्शनजस्त: भरतस्येव तस्य च ॥3॥
शत्रुघ्नामागुनी जाई सुमन्त्र तोहि उत्सुक ।
श्रीरामदर्शन तीव्र अभिलाषा त्यासही असे ॥3॥
गच्छन्नेवाथ भरतस्तापसालयसंस्थिताम्‌ ।
भ्रातु: पर्णकुटी श्रीमानुटजं च ददर्श ह ॥4॥

जातानाच दिसे भरता तपस्वी आश्रमासम ।
पर्णकुटि बन्धूची परिसरात स्थापित ॥4॥

शालायास्त्वग्रतस्तस्या ददर्श भरतस्तदा ।
काष्ठानि चावभग्नानि पुष्पाण्यपचितानि च ॥5॥

भरत पाही भग्न काष्ठे पर्णशालेपुढे।
होमास्तव पुजेसाठी फुलेही वेचिली तशी ॥5॥

स लक्ष्मणस्य रामस्य ददर्शाश्रममीयुषः।
कृतं वृक्षेष्वभिज्ञानं कुशचीरैः क्वचित् क्वचित् ॥6॥

लक्ष्मण रामानी चिह्ने मार्गबोधक निर्मिली।
कुश चीरे वृक्षांवरी तयार करुनी लावली ॥6॥
ददर्श च वने तस्मिन् महतः संचयान् कृतान् ।
मृगाणां महिषाणां च करीषैः शीतकारणात ॥7॥
पाहती त्या वनी केला संचय शीतनिवारणी ।
गोवऱ्यांचा महिषींच्या मृगांच्या लेंड्यांचा तसा॥7॥
गच्छन्नेवमहाबाहुर्द्युतिमान् भरतस्तदा ।
शत्रुघ्नं चाब्रवीत हृष्टस्तानमात्यांश्च सर्वशः॥8॥

जात असता भरताने महाबाहु कांतिमान ।
शत्रुघ्नासवे मन्त्र्यांना कथिले प्रसन्न होउनी ॥8॥
मन्ये प्राप्ता: स्म तं देशं भरद्वाजो यमब्रवीत ।
नातिदूरे हि मन्येऽहं नदीं मन्दाकिनीमित:॥9॥
भरद्वाज महर्षींनी कथिले त्या स्थानि आपण ।
आलो आहोत नसे दूर मन्दाकिनी नदि येथुनी ॥9॥
उच्चैर्बद्धानि चीराणि लक्ष्मणेन भवेदयम् ।
अभिज्ञानकृत: पन्था विकाले गन्तुमिच्छता ॥10॥

दिसती वृक्षावरि चीर लक्ष्मणे बहिर्गमनास्तव ।
लाविले व्हावे म्हणुनी मार्गदर्शन आश्रमा ॥10॥
इतश्चोदात्तदन्तानां कुञ्जराणां तरस्विनाम् ।
शैलपाड्ं परिक्रान्तमन्योन्यमभिगर्जताम् ॥11॥
भव्यदन्त असे हत्ती गर्जत एकमेकाप्रति ।
पार्श्वभागे पर्वताच्या फिरति करत विहार ॥11॥
यमेवाधातुमिच्छन्ति तापसाः सततं वने ।
तस्यासौ दृष्यते धूमः संकुलः कृष्णवर्त्मनः॥12॥

तपस्वी वनि आधान ज्याचे सदैव करती ।
धूम्ररूपे अग्निदेव दिसे सघन येथुनी ॥12॥
अत्राहं पुरुषव्याघ्रं गुरुसत्कारकारिणाम् ।
आर्य द्रक्ष्यामि संहृष्टं महर्षिमिव राघवम् ॥13॥
इथे जो पुरुषसिंह सत्कार गुरुंचा करी ।
दर्शन करीन त्याचे महर्षि आनंदमग्न जो॥13॥
अथ गत्वा मुहूर्तं तु चित्रकूटं स राघवः।
मन्दाकिनीमनुप्राप्तस्तं जनं चेदमब्रवीत ॥14॥

जाउनी दोन घडीत भरत चित्रकूटावरी ।
मन्दाकिनितटी जात बोले स्वजनांप्रति ॥14॥

जगत्या पुरुषव्याघ्र आस्ते वीरासने रतः।
जनेन्द्रो निर्जनं प्राप्य धिने जन्म सजीवितम ॥15॥

माझ्यामुळे रघुनाथ संकटात पडूनिया ॥
सर्वसंग परित्याग करुनिया राही वनी ॥15॥

मत्कृते व्यसनं प्राप्तो लोकनाथो महाद्युतिः।
सर्वान कामान परित्यज्य वने असति राघवः ॥16॥

महातेजस्वी श्रीराम मजसाठि पडुनि संकटी ।
त्यागुनि कामना सर्व करती निवास वनी ॥16॥

इति लोकसमाकृष्टः पादेष्वस्य प्रसादयन् ।
रामं तस्य पतिष्यामि सीताया लक्ष्मणस्य च ।17॥

लोकांकडुनि निंदित श्रीरामाच्या पदावरी ।
लक्ष्मण सीता यांच्याही पडुनी मी पायावरी ॥17॥

एवं स विलपंस्तस्मिन् वने दशरथात्मजः।
ददर्श महतीं पुण्यां पर्णशालां मनोरमम् ॥18॥

विलाप करिता ऐसा पाहतो दशरथसुत ।
पर्णशाला वनी मोठी पवित्र नि मनोरम ॥18॥

सालतालाश्वकर्णानां पर्णैर्बहुभिरावृताम् ।
विशालां मृदुभिस्तीर्णां कुशैर्वेदिमिवाध्वरे ॥19॥

अश्वकर्ण वृक्षपत्रे आच्छादित शोभतसे ।
कुश आच्छादित वेदी यज्ञशाळेतली जशी ॥19॥

शक्रायुधनिकाशैश्च कार्मुकै रसाधनैः॥
रुक्मपृष्ठैर्महासारैः शोभितां शत्रुबाधकैः॥20॥

अनेक धनुष्ये होती इन्द्रधनुसमान जी।
सुवर्णमंडित पृष्ठ प्रबल शत्रुस पीडन ।
पर्णकुटिची शोभा वाढविति त्यामुळे ॥20॥
अर्करश्मिप्रतीकाशशैरस्तूणगते शरैः।
शोभिता दीप्तवदनैः सर्भोगवतीमिव ॥21॥
अर्करश्मिपरी बाण भात्यातिल चमकती ।
पर्णशाला दीप्तिमान भोगवती पुरीसम ॥21॥
महारजतवासोभ्यामसिभ्यां च विराजिताम्।

रुक्मबिन्दुविचित्राभ्यां चर्मभ्यां चापि शोभिताम् ॥22॥

तलवारी म्यानामध्ये सोन्याच्या ढाली तश्या ।

स्वर्णबिन्दु विभूषित शोभती आश्रमात त्या ॥22॥

गोधाङ्गुलित्रैरासक्तैश्चित्रकाञ्चनभूषितैः।

अरिसंघैरनाधृष्यां मृगैः सिंहगुहामिव ॥23॥

सुवर्णजडित गोचर्म पटल सर्वत्र टांगले ।

गुहा मृगांची जैसी रक्षित सिंहापासुनी ।

पर्णशाला तशी तीही शत्रुना अभेद्य जी ॥23॥

प्रागुदक्प्रवणां वेदिं विशालां दीप्तपावकाम् ।
ददर्श भरतस्तत्र पुण्यां रामनिवेशने ॥24॥

पवित्र विशाल वेदि खाली इशान्येकडे ।
पाही अग्निप्रज्वलित भरत राननिवासी ॥24॥

निरीक्ष्य स मुहूर्तं तु ददर्श भरतो गुरुम् ।
उटजे राममासीनं जटामण्डलधारिणम् ॥25॥

कृष्णाजिनधरं तंतु चीरवल्कलवाससम् ।
ददर्श राममासीनमभितः पावकोपमम् ॥26॥

काही क्षणानंतर भ्राता पूजनीय श्रीराम दिसे ।
कुटीत जटामण्डल चीर वल्कल धारुनी ॥25॥
कृष्णमृगचर्म सहित श्रीराम भरता दिसे ।
प्रजवलित अग्निपरी प्रभामंडल पसरता ॥26॥
सिंहस्कंधं महाबाहु: पुण्डरीकनिभेक्षनम्।
पृथिव्या: सागरान्ताया भर्तारं धर्मचारिणाम् ॥27॥
उपविष्टं महाबाहुं ब्रह्माणमिव शाश्वतम् ।
स्थण्डिले दर्भसंस्तीर्णे सीतया लक्ष्मणेन च ॥28॥

आसमुद्र पृथ्वीपति धर्मात्मा महाबाहू ।
विशाल कमलासम नेत्र श्रीराम बैसती ॥27॥
कुशवेदीवरी ब्रह्मा सनातन जसा बसे ।
असती लक्ष्मण सीता सवे त्याच्या बैसले ॥28॥
तं दृष्ट्वा भरतः श्रीमान् शोकमोहपरिप्लुतः।
अभ्यधावत् धर्मात्मा कैकयीसुतः॥29॥
अवस्थेत पाहुनि त्यां भरत कैकयीसुत ।
शोक मोह अवस्थेत धावती त्यांच्याकडे ॥29॥

दृष्ट्वैव विललापा च बाष्पसंदिग्धया गिरा ।
अशक्नुवन् वारयितुं धैर्याद् वचनमब्रुवन् ॥30॥

पाहुनी विलाप करी येता दाटुनिया गळा ।
न आवरे शोकावेग गद्गद वाणीने म्हणे ॥30॥

यः संसदि प्रकृतिभिर्भवेद् युक्त उपासितुम् ।
वन्यैर्मृगरुपासीनः सोऽयमास्ते ममाग्रजः॥31॥

बसुनी राजसभेत सन्मानित मन्त्रिजने ।
होण्या योग्य बन्धु मम असे वन्य पशूंसवे ॥31॥

वासोभिर्बहुसाहस्रो महात्मा पुरोचित:।

मृगाजिने सोऽयमिह प्रवस्ते धर्ममाचरन् ॥32॥

महात्मा सहस्र वस्त्रे पूर्वी परिधान करी ।

मृगचर्मे धारण दोन करी धर्माचरणास्तव ॥33॥

यस्य यज्ञैर्यथादिष्टैर्युक्तो धर्मस्य संचय:।

शरीरक्लेशसम्भूतं स धर्म परिमार्गते }}34॥

शास्त्रोक्त यज्ञ अनुष्ठाने धर्मसंग्रह उचित ज्या ।

तो शरीरा कष्टवूनी करीतो धर्म संचय ॥34॥

चन्दनेन महार्हेण यस्याङ्गमुपसेवितम् ।
मलेन तस्याङ्गमिदं कथामार्यस्य सेव्यते ॥35॥
चन्दनाने बहुमूल्य ज्याचे अङ्ग सेवित ।
पूज्य भ्रात्याचे त्या आज शरीर मलसेवित ॥35॥
मन्निमित्तमिदं दु:खं प्राप्तो राम: सुखोचित:।
धिग्जीवितं नृशंसस्य मम लोकविगर्हितम् ॥36॥
सुख भोगण्या जो योग्य दु:खात मजकारणे ।
धिक्कार मम मी क्रूर लोकनिन्दित जीवन ॥36॥

इत्येव विलपन् दीनः प्रस्विन्नमुखपङ्कजः।

पादावप्राप्य रामस्य पपात भरतो रुदन् ॥37॥

दुःखी होउनि विलपत घर्मबिन्दु मुखावरी ।

स्पर्शण्यापूर्वी रामाच्या पदा भूमिवरी पडे ॥37॥

दुःखाभितप्तो भरतो राजपुत्रो महाबलः।

उक्त्वाऽऽर्येति सकृद् दीनं पुनर्नोवाच किंचन ॥38॥

दुःखातिरेके दीन “आर्य” इतुकेचि बोलला।

राजपुत्र तो भरत पुढे काहि बोलु ना शके ॥38॥

बाष्पैः पिहितकण्ठश्च प्रेक्ष्य रामं यशस्विनम् ।
आर्येत्येवाभिसंक्रुश्य व्याहर्तुं नाशकत ततः॥39॥
कंठ हो रुद्ध अश्रूंनी यशस्वी रामा पाहुनी ।
हा आर्य पुकारी ऐसे पुढे न बोलू शके ॥39॥
शत्रुघ्नश्चापि रामस्य ववन्दे चरनौ रुदन् ।
तावुभौ च समालिङ्ग्य रामोऽप्यश्रूण्यवर्तयत ॥40॥
शत्रुघ्नहि विलाप करता पडे श्रीरामचरणावरी ।
श्रीराम उभया लावी हृदया सर्व स्फुंदत ॥40॥

ततः सुमन्त्रेण गुहेन चैव समीयतू राजसुतावरण्ये।
दिवाकरश्चैव निशाकरश्च यथाम्बरे शुक्रबृहस्पतिभ्याम् ॥41॥
गुहासवे सुमन्त्रास दोघे श्रीराम लक्ष्मण वनात भेटती ।
जणु आकाशी सूर्य चंद्रमा मिळती शुक्रबृहस्पती यांस ॥41॥
तान् पार्थिवान् वारणयूथपार्हान् समागतांस्तत्र महत्येरण्ये ।
वनौकसस्तेऽभिसमीक्ष्य सर्वे त्वश्रूण्यमुञ्चन् प्रविहाय हर्षम् ॥42॥
पाहूनि त्या चार राजकुमारा गजावरी बैसुनी फिरण्यास योग्य ।
वनी विशाल येति पाहुनि हर्ष सोडुनि अश्रु गाळीति वनवासी समस्त॥42॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे नवनवतितम: सर्ग: ॥99॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 100

जटिलं चीरवसनं प्राञ्जलिं पतितं भुवि ।
ददर्श रामो दुर्दर्श युगान्ते भास्करं यथा ॥1॥
कथंचिदभिविज्ञाय विवर्णवदनं कृशम् ।
भ्रातरं भरतं रामः परिजग्राह पाणिना ॥2॥
आघ्राय रामस्तं मूर्ध्नि परिष्वज्य च राघवम् ।
अङ्के भरतमारोप्य पर्यपृच्छत सादरम् ॥3॥

भरत चीरवसन जटांसह पतित भूवरी ।
पाही राम जणू सूर्य पडे प्रलये भूवरी ॥1॥
विवर्ण मुख तयाला ओळखून कसेबसे ।
बन्धु भरतास राम उठवी हाता धरुनिया ॥2॥
मस्तकी हुंगुनी त्यास हृदयास लावोनिया ।
अंकी भरता बसवूनी आदरे विचारी तया ॥3॥
क्व नु तेऽभ्रुत पिता तात यदरण्यं त्वमागतः।
न हि त्वं जीवतस्तस्य वनमागन्तुमर्हसि ॥4॥

पिताश्री कुठे असती वनी स्वत: का येसि तू ।
जिवित जोवरी ते तू वनी येणे अशक्यच ॥4॥

चिरस्य बत पश्यामि दूराद् भरतमागतम् ।
दुष्प्रतीकमरण्येऽस्मिन् किं तात वनमागत:॥5॥

दीर्घ कालानंतर मी पाहिले तुजला वनी ।
येसी दुरुनी दुर्बल शरीरे काय कारण ॥5॥

अच्चिन्नु धरते तात राजा यत त्वमिहागत:।
कच्चिन्न दीन: सहसा राजा लोकान्तरं गत:॥6॥

आहेत जीवित तात की दु:खातिरेके होती।
परलोकवासी तदा स्वत: तू येसि आजला ॥6॥
कच्चित सौम्य न ते राज्यं भ्रष्टं बालस्य शाश्वतम ।
कच्चिच्छुश्रूषहे तात पितु: सत्यपराक्रम: ॥7॥
बालक असल्याने तू राज्य नष्ट झाले काय ?।
सत्यपराक्रमि ताता सेवसी ना यथोचित ?॥7॥
कच्चिद् दशरथो राजा कुशली सत्यसंगर:।
राजसूयाश्वमेधानामाहर्ता धर्मनिश्चित"॥8॥

अटल धर्मावरती कर्ते अश्वमेघ यज्ञाचे।

सत्यप्रतिज्ञ तात असती सकुशल ना ?॥8॥

स कच्चिद् ब्राह्मणो विद्वान धर्मनित्यो महाद्युतिः।

इक्ष्वाकूणामुपाध्यायो यथावत तात पूज्यते ॥9॥

तात धर्मज्ञ विद्वान इक्ष्वाकुकुल आचार्या ।

महातेजस्वी वसिष्ठा पूजिसी ना यथाविधि?॥9॥

तात कच्चिच्च कौसल्या सुमित्रा च प्रजावती ।

सुखिनी कच्चिदार्या च देवी नन्दति कैकयी ॥10॥

असे का सुखी कौसल्या सुमित्रा सुप्रजावती ।
प्रसन्न तैसी आर्या कैकेयीही आनंदिता ॥10॥

कच्चित विनयसम्पन्नः कुलपुत्रो बहुश्रुतः।
अनसूयुरनुद्रष्टा सत्कृतस्ते पुरोहितः ॥11॥

केला का विनयसम्पन्न बहुश्रुत पुरोहित ।
कुलशील उत्तम ज्यांचे सत्कार त्यांचा तुम्ही ॥11॥

कच्चिदग्निषु ते युक्तो विधिज्ञो मतिमानुजुः ।
हुतं च होष्यमाणं च काले वेदवते सदा ॥12॥

केले ना नियुक्त द्विज अग्निहोत्र कार्यास्तव ?।
जाणती हवनविधि बुद्धिमान स्वभावे ऋजु ।
आहुति देण्याचे किंवा हवन करणे सांगती ॥12॥
कच्चिद् देवान् पितृन् भृत्यान् गुरून् पितृसमानपि।
वृद्धांश्च तात वैद्यांश्च ब्राहमणांश्चाभिमन्यसे ॥13॥
सत्कारिले का तुम्ही देवता,पितरा सवे।
गुरू,वृद्ध पित्यासम,वैद्य,ब्राह्मण यांजला ॥13॥

इष्वस्त्रवरसम्पन्नमर्थशास्त्रविशारदम् ।

सुधन्वानमुपाध्यायं कच्चित् त्वं तात मन्यसे ॥14॥

मन्त्ररहित उत्तम बाण अस्त्रे जी मन्त्रासवे ।

प्रयोग करणे त्यांचा याचे ज्ञान जया असे ।

अर्थशास्त्रज्ञ पंडित असे आचार्य सुधन्वा तयां

योग्य आदर देसी ना? सांग हे मज तू मला ॥14॥

कच्चिदात्मसमाः शूराः श्रुतवन्तो जितेन्द्रियाः।

कुलीनाश्चेङ्गितज्ञाश्च कृतास्ते तात मन्त्रिणः॥15॥

आपल्यासारखे शूर शास्त्रज्ञ जितेन्द्रिय ।
कुलीन अन्तर्ज्ञानी यां मन्त्रिपद देसि ना?॥15॥

मन्तो विजयमूलं हि राज्ञां भवति राघव ।
सुसंवृतो मन्त्रिधुरैरमात्यैः शास्त्रकोविदैः ॥16॥

योग्य मन्त्रणा हीच विजया कारण असे ।
गुप्त ठेविति जे मन्त्री निपुण नीति शास्त्रामध्ये॥16॥

कच्चिन्निद्रावशं नैषि कच्चित् कालेऽवबुध्यसे ।
कच्चिच्चापररात्रेषु चिन्तयस्यर्थनैपुणम् ॥17॥

योग्य समयी निद्रा योग्य समयी जागृत ।
अर्थसिद्धीवरी करसी ना विचार रात्रीमध्ये ? ||17||

कच्चिन्मन्त्रयसे नैकः कच्चिन्न बहुभिः सह ।
कच्चित् ते मन्त्रितो मन्त्रो राष्ट्रं न परिधावति||18||

करिसी न एकटा अथवा अनेक जणांसवे ।
विचार ज्यामुळे होई निर्णय न सर्वजनी ||18||

कच्चिद् अर्थम् विनिश्चित्य लघु मूलम् महोदयम् ।
क्षिप्रम् आरभसे कर्तुम् न दीर्घयसि राघव ||19||

भरता आशा करतो आरंभसि कर्मास तू ।
निश्चये लघु मूल्यात विलंब नच लावता ॥19॥
कच्चित् तु सुकृतान्येव कृत रूपाणि वा पुन:।
विदु: ते सर्व कार्याणि न कर्तव्यानि पार्थिवा:॥20॥
आशा करतो तुझी कृत्ये अन्य नृप तंव जाणती ।
जंव होतील ती पूर्ण विचारर्ह नसति केवळ ॥20॥
कच्चिन्न तर्कैर्युक्त्वा वा ये च अप्यापरिकीर्तिता:।
त्वया वा तव वा अमात्यैर्बुध्यते तात मन्त्रितम् ॥21॥

जाणति इतर ना तर्के वा इतरांना विचारुनी ।
विचारविनिमयाचे तथ्य मन्त्र्यांसह करसी तू जे? ॥21॥

कच्चित सहस्रान मूर्खाणाम एकम इच्छसि पण्डितम ।
पण्डितो ह्यर्थ कृच्छ्रेषु कुर्यान बि:श्रेयसम महत ॥22॥

मूर्खांऐवजी सहस्र पण्डिता एक राखणे ।
सहाय्या कठिण प्रसंगी असे योग्य पण्डित ॥22॥

सहास्राण्यपि मूर्खाणाम यद्युपास्ते मही पति:।
अथ वा अप्युतानैव न अस्ति तेषु सहायता ॥23॥

सहस्र मूर्खांना किंवा दहा सहस्रानाहि नेमुनी।
उपयोग नसे होत त्यांचा नृपास काहीहि ॥23॥
एको अप्यामात्यो मेधावी शूरो गक्षो विचक्षणः।
राजानाम् राज मात्रम् वा प्रापयेन महतीम् श्रियम् ॥24॥
दूरदर्शी शूर दक्ष एकही मन्त्री बुद्धिमान् ।
वाढवी कीर्ति राजा वा राज्यकर्त्यांचि जो असे ॥24॥
कच्चिचन् मुख्या महत्सु एव मध्यमेषु च मध्यमाः।
जघन्याः च जघन्येषु भृत्याः कर्मसु पीडिताः॥25॥

उत्तम सेवक श्रेष्ठ कर्मी मध्यम मध्यमी ।
कनिष्ठ कनिष्ठ कामी नेमिले असतील तू ॥25॥
अमात्यान् उपधा अतीतान् पितृपैतामहान् शुचीन् ।
श्रेष्ठान् श्रेष्ठेषु कच्चित् त्वम् नियोजयसि कर्मसु ॥26॥
अमात्या चारित्र्यपूर्ण कुलवान् शुचिमानही।
असशी नेमिले मन्त्री कुशल कार्ये महान् ॥26॥
कच्चिनोग्रेण दण्डेन भृशमुद्वेजितप्रजम् ।
राज्यं तवानुजानन्ति मन्त्रिण: कैकयीसुत ॥27॥

भरता तुझे सहाय्यक भयभीत प्रजाजना ।
केवळ पाहत नसती सहाय्य करती तया ॥27॥

कच्चित त्वाम् न अवजानन्ति याजका: पतितम् यथा ।
उग्र प्रतिग्रहीतारम् कामयानम् इव स्त्रिय:॥28॥

कर जे देती तुजला न पाहति अनादरे।
जैसे पवित्र याजक यजमाना पतित जो ।
वा स्त्रिया कामी पुरुषां पाहताति अनादरे ॥28॥

उपायकुशलं वैद्यं भृत्यसंदूषणे रतम् ।
शूरमैश्वर्यकामं च यो हन्ति न स हन्यते ॥29॥

कुशल वैद्य परि जो वाढवी यातना तया ।
किंवा सेवक दुष्कीर्ति यजमाना आणि आपल्या ।
किवा इच्छि जो योद्धा राजाचे अधिकार त्या।
जर ना वधले त्याला शासकच मरे स्वत: ॥29॥

कच्चिद् हृष्टः च शूरः च श्रुतिमान् मतिमान् शुचिः।
कुलीनः च अनुरक्तः च दक्षः सेनापतिः कृतः ॥30॥

असशील नेमले तू बुद्धिमान पराक्रमी ।
कार्यनिपुण सेनानी सैन्यात प्रिय जो असे ॥30॥
बलवन्तः च कच्चित ते मुख्या युद्धविशारदाः।
दृष्ट अपदाना विक्रान्ताः त्वया सत्कृत्य मानितः॥31॥
असति ना बलवान योद्धे प्रविण युद्धविशारद ।
योग्य मान तया देशी सत्कारुनि यथोचित ॥31॥
कच्चिद् बलस्य भक्तम् च चेतनम् च यथोचितम् ।
सम्प्राप्तकालम् दातव्यम् ददासि न विलम्बसे ॥32॥

आशा करतो देसी तव सैन्यास योग्य वेतन ।
दैनंदिन वस्तु योग्य विलंब करता नच ॥32॥
कालातिक्रमणे ह्यैव भक्त वेतनयोर्भृता:।
भर्तु: कुप्यति दुष्यन्ति सो अनर्थ: सुमहान्स्मृत:॥33॥
विलंब करता देण्या अन्न वेतन सेवका ।
कोपती धन्यावरती दुर्दैवी ही परिस्थिती ॥33॥
कच्चित सर्वे अनुरक्ता: त्वाम्कुल पुत्रा: प्रधानत:।
कच्चित प्राणाम: तव अर्थेषु सम्यजन्ति समाहिता: ॥34॥

आशा करतो इक्ष्वाकु कुलपुत्र तुझ्यावरी ।
अनुरक्त तुझ्यासाठी उद्युक्त प्राणत्यागासही॥34॥
कच्चिद् जानपदो विद्वान् दक्षिण: प्रतिभानवान् ।
यथा उक्त वादी दूत: ते कृतो भरत पण्डित:॥35॥
विद्वान नियुक्त केला असशील जानपदी ।
युक्तभाषी प्रतिभावान् राजदूत म्हणुनिया ॥35॥
कच्चिद् अष्टादशानन्येषु स्व पक्षे दश पन्च च ।
त्रिभि: त्रिभिर् अविज्नातैर् वेत्सि तीर्थानि चारकै:॥36॥

तीन हेरांकडूनि जे एकमेका न जाणति।
वार्ता ठेवसि का शत्रूंच्या अठरा आणि आपुल्या
पंचादश अधिकारी असती जे उभय पक्षाकडे ॥36॥

या अधिकाऱ्यांत शत्रु व स्वपक्षाकडील मन्त्री,पुरोहित,सेनापती यांचा समावेश होतो.

कच्चिद् व्यपास्तानहितान् प्रतियातांश्च सर्वदा ।
दुर्बलाननवज्ञाय वर्तसे रिपुसूदन ॥37॥

शत्रु निष्काषित राज्ये परतुनि आले जर ।
करसी न दुर्लक्षित त्यां मानुनीया दुर्बल?॥37॥

कच्चिन्न्लोकायतिकान्‌ ब्राह्मणांस्तात सेवसे ।
अनर्थकुशला ह्येते बाला: पण्डितमानिन: ॥38॥
संग नास्तिक द्विजांचा करत तू नाहीस ना?
समजती पण्डित जे स्वत:स अनर्थकारक ॥38॥
धर्मशास्त्रेषु मुख्येषु विद्यमानेषु दुर्बुधा:।
बुद्धिमान्वीक्षिकी प्राप्य निरर्थ प्रवदन्ति ते ॥39॥
वेदांस मानति ना ते धर्मशास्त्रा सोडुनी ।
विवाद मानुनि तर्का निरर्थक करीति ते ॥39॥

वीरैरध्युषितां पूर्वमस्माकं तात पूर्वकैः।
सत्यनामा दृढद्वारा हस्त्यश्वरथसंकुलाम् ॥40॥
ब्राह्मणैः क्षत्रियैर्वैश्यैः स्वकर्मनिरतैः सदा ।
जितेन्द्रियैर्महोत्साहैर्वृतामार्यैः सहस्रशः॥41॥
प्रासादैर्विविधाकारैर्वृतां वैद्यजनाकुलाम् ।
कच्चित् समुदितां स्फीतामयोध्यां परिरक्षसे ॥42॥

पूर्वजांची वीर भूमि गुणे नामासम आमुच्या ।
परिपूर्ण दृढ द्वारे अश्व गज रथ संकुले॥40॥

स्वकर्मी रत ब्राह्मण वैश्य क्षत्रिय सहस्रशः।
जितेन्द्रिय श्रेष्ठ ते सर्व उत्साही राहती इथे ॥41॥
प्रासाद विविधाकार मन्दिरे विद्वज्जने।
युक्त नगरी अयोध्या रक्षसी ना यथाविधि ॥42॥
कच्चिच्चैत्यशतैर्जुष्टः सुनिविष्टजनाकुलः।
देवस्थानैः प्रपाभिष्च तटाकैश्चोपशोभितः॥43॥
प्रहृष्टनरनारीकः समाजोत्सवशोभितः।
सुकृष्टसीमापशुमान् हिंसाभिरभिवर्हितः॥44॥

अदेवमातृको रम्य: श्वापदै: परिवर्जित:।
परित्यक्तो भयै: सर्वै: खनिभिश्चोपशोभित:॥45॥
विवर्जितो नरै: पापैर्मम पूर्वै: सुरक्षित:।
कच्चिचअज्जनपद: स्फीत: सुखं वसति राघव ॥46॥

गमे मज शान्तिपूर्ण स्थले युक्त मन्दिरे ।
जमती उत्सवासाठी आनंदी पुरुषस्त्रिया ॥43॥
चैत्य तलाव जलयुक्त भूमि उत्तम जीवरी ।
पशु असती शेतीस योग्य हिंसा न होतसे ॥44॥

भूमि केवळ वर्षाजलावरि न आधारित ।
शेतीस्तव उपलब्ध जल नदी तलावातले ॥45॥
नसे भय कोणा पापी नसति ज्या स्थली ।
धनधान्ययुक्त देश सुखे वास करीतसे ॥46॥
कच्चित ते दयिता: सर्वे कृषि गो रक्ष जीविन:।
वार्तायाम संश्रित: तात लोको हि सुखमेधते ॥47॥
करसी ना त्यांच्यावर प्रीति जे वैश्य कृषिवल।
गोरक्षण करती ते उन्नतिशील जे सुखी ॥47॥

तेषां गुप्तिपरीहारैः कच्चित ते भरणं कृतम् ।
रक्ष्या हि राजा धर्मेण सर्वे विषयवासिनः ॥48॥

पाहसी ना तया इष्ट प्राप्ती भरणपोषण ।
राजकर्तव्य प्रजेचे धर्मानुसार पालन ॥48॥

कच्चित स्त्रियः सान्त्वयसे कच्चित तास्ते सुरक्षिताः।
कच्चिन्न श्रद्दधास्यासां कच्चिद् गुह्यं न भाष्यसे ॥49॥

संतुष्ट ठेविसी ना स्त्रियांना सुरक्षित ।
ठेवत तर नाहीस अतिविश्वास तयांवरी ।

गुप्त गोष्टी तयां सर्व सांगत तर नाहिस?।।49।।

कच्चिन्नागवनं गुप्तं कच्चित् ते सन्ति धेनुकाः।

कच्चिन्न गणिजाश्वानां कुञ्जरानां च तृप्यसि ।।50।।

गज जन्मति वन ज्यात ते असे ना सुरक्षित ।

गाई दूध देणाऱ्या असती ना पुष्कळ ।

संग्रह गज अश्वांचा सतत वाढवीसि ना?।।50।।

कच्चिद् दर्शयसे नित्यं मानुषाणां विभूषितम् ।

उत्थायोत्थाय पूर्वाणे राजपुत्र महापथे ।।51।।

भेटसी का प्रतिदिनी वस्त्रभूषण विभूषित ।
प्रात:काली नागरिकां मुख्य मुख्य पथावरी ॥61॥

कच्चिन्न सर्वे कर्मान्ता: प्रत्यक्षास्तेऽविशङ्कया ।
सर्वे पुनरुत्सृष्टा मध्यमेवात्र कारणम् ॥52॥

कर्मान्ती येती नर ना निर्भये वा दूर सदा ।
राहती मध्यममार्ग अर्थसिद्धिस कारण ॥52॥

कच्चिद् दुर्गाणि सर्वाणि धनधान्यायुधोदकै:।
यन्त्रैश्च प्रतिपूर्णानि तथा शिल्पधनुर्धरै:॥53॥

दुर्ग सर्व असती ना धनधान्य शस्त्रे जले ।
यन्त्रे,शिल्पी धनुर्धर सैनिके भरले बहु ॥53॥

आयस्ते विपुल: कच्चित कच्चिदल्पतरो व्यय:।
अपात्रेषु न ते कच्चित कोषो गच्छति राघव:॥54॥

असे ना अधिक आय व्यय मात्र अल्प असे ।
कोशातिल धन जाईना अपात्रांच्या हातामध्ये?॥54॥

देवतार्थे च पित्रर्थे ब्राह्मणाभ्यागतेषु च ।
योधेषु मित्रवर्गेषु कच्चिद् गच्छति ते व्यय: ॥55॥

देवता पितर ब्राह्मण योद्धा अभ्यागतांस्तव ।

मित्रांसाठी करिसी ना धनाचा व्यय तुझ्या?॥55॥

कच्चिदार्योऽपि शुद्धात्मा क्षारितश्चापकर्मणा ।

अदृष्टः शास्त्रकुशलैर्न लोभाद् बध्यते शुचिः ॥56॥

श्रेष्ठ निर्दोष शुद्धात्म्या दोष दिधला जर कुणी ।

असे होत नाही ना ?विद्वान शास्त्रकुशल जे।

विचार न करता त्यास लोभे आर्थिक दण्डती ॥56॥

गृहीतश्चैव पृष्टश्च काले दुष्टः सकारणः।
कच्चिन्न मुच्यते चोरो धनलोभान्नरार्षभ ॥57॥

असे होत तर नाही ? चोरी करताना प्रत्यक्ष ।
पाहूनहि त्या व्यक्तीस धनलोभाने सोडती ॥57॥

व्यसने कच्चिदाढ्यस्य दुर्बलस्य च राघव ।
अर्थ विरागाः पश्यन्ति तवामात्या बहुश्रुताः॥58॥

दरिद्री श्रीमन्त वादे मन्त्री निःपक्ष होउनी ।
देती न्याय की विचार मनी धनलाभाचा आणती ॥58॥

यानि मिथ्याभिशस्तानां पतन्त्यश्रूणि राघव ।
तानि पुत्रपशून् जन्ति प्रीत्यर्थमनुशासत:॥59॥
निर्दोषा करिता दण्ड त्यांचे अश्रु नाशती ।
पुत्र पशु राजाचे जो पक्षपाती शासन करी ॥59॥
कच्चिद् वृद्धांश्च बालांश्च वैद्यान् मुख्यांश्च राघव ।
दानेन मनसा वाचा त्रिभिरेतैर्बुभूषसे ॥60॥
सन्मान करिसी ना तू दाने मने मधु भाषणे।
बालक वृद्ध प्रधान वैद्य या सर्वजणांचा ॥60॥

कच्चिद् गुरूंश्च वृद्धांश्च तापसान् देवतातिथीन् ।
चैत्यांश्च सर्वान् सिद्धार्थान् ब्राह्मणांश्च नमस्यसि ॥61॥

आदरसी ना नमस्कारे गुरु वृद्ध तपस्वीजन।
देवता अतिथि चैत्य वृक्ष सिद्धार्थ ब्राह्मण ॥61॥

कच्चिदर्थेन वा धर्ममर्थं धर्मेण वा पुनः।
उभौ वा प्रीतिलोभेन कामेन ना विबाधसे ॥62॥

अर्थे धर्मास वा धर्मे अर्था हानि न पोचवी।
आसक्ति लोभे उभया बाधा आणणे टाळसी॥62॥

कच्चिदर्थं च कामं च धर्मं च जयतां वर ।

विभज्य काले कालज्ञ सर्वान्‌ वरद सेवसे ॥63॥

योग्य विभागुनि काल धर्म अर्थ काम यामधे ।

भोगसी ना भरता तू वरदा श्रेष्ठ वीर जो ॥63॥

कच्चित्‌ ते ब्राह्मणाः शर्म सर्वशास्त्रार्थकोविदाः।

आशंसन्ते महाप्राज्ञ पौरजानपदैः सह ॥64॥

पौर जानपदवासी तव कल्याणाचि त्यांसवे ।

कामना करिती ना जे सर्वशात्रार्थकोविद? ॥64॥

नास्तिक्यमनृतम् क्रोधं प्रमादं दीर्घसूत्रताम् ।
अदर्शनं ज्ञानवतामालस्यं पञ्चवृत्तिइताम् ॥65॥
एकचिन्तनममर्थानामनर्थज्ञैश्च मन्त्रणम् ।
निश्चितानामनारन्भं मन्त्रस्यापरिरक्षणम् ॥66॥
मङ्गलाद्यप्रयोगं च प्रत्युत्थानं च सर्वतः ।
कच्चित त्वं वर्जयस्येतान् राजदोषांश्चतुर्दश ॥67॥

असत्य वच नास्तिक्य प्रमाद दीर्घसूत्रता ।
आलस्य क्रोध असंग ज्ञानींचा इंद्रियवश ॥65॥

अयोग्यांकडुनी सल्ला विलम्ब कार्यी निश्चित ।
सुरक्षित न ठेवणे गुप्त मन्त्रणा प्रकट करी ॥66॥
शत्रूवर चढाई सर्व माङ्गलिक अनुष्ठान ।
त्यागसी दोष चौदा तू सत्य हेच असेल ना? ॥67॥
दशपञ्चचतुर्वर्गान् सप्तवर्गं च तत्वत:।
अष्टवर्गं त्रिवर्गं च विद्यास्तिस्त्रश्च राघव ॥68॥
अन्द्रियाणां जयं बुद्ध्वा षाड्गुण्यं दैवमानुषम् ।
कत्यं विंशतिवर्गं च तथा प्रकृतिमण्डलम् ॥69॥

यात्रादण्डविधानं च द्वियोनी संधिविग्रहौ ।
कच्चिदेतान् महाप्राज्ञ यथावदनुमन्यसे ॥70॥

दशवर्ग पञ्चवर्ग चतुर्वर्ग सप्तवर्गही ।
त्रिवर्गहि अष्टवर्ग तीन विद्यांकडे राघवा ॥68॥
जित इंद्रिये बुद्धीने सहा गुण दैवि मानवी
करावे वीस हे वर्ग राजास नीतिपूर्ण जे ॥69॥
आक्रमण शत्रुवरी व्यूह द्वियोनी संधिविग्रही ।
योग्य ते ग्रहण करुनी अयोग्य ते त्यजिसी ना? ॥70॥

वरील तीन श्लोकात राजासाठी आवश्यक व अनिष्ट गुणावगुणांचे क्रमांकासह वर्णन आहे व त्याचे स्पष्टीकरण बरेच मोठे आहे, परिशिष्टात ते दिले जाईल.म्हणून येथे ते टाळले आहे,

मन्त्रिभिस्त्वं यथोद्दिष्टं चतुर्भिस्त्रिभिरेव वा ।
कच्चित् समस्तैर्व्यस्तैश्च मन्त्रं मन्त्रयसे बुध ॥71॥

नीतिशास्त्रानुसारेण तीन वा चार मन्त्रियांसवे ।
एकत्र वा स्वतन्त्र सल्लामसलत करीसि ना ?॥71॥

कच्चित् ते सफला वेदा: कच्चित् ते सफला: क्रिया:
कच्चित् ते सफला दारा: कच्चित् ते सफलं श्रुतम् ॥72॥

वेदानुसार करुनी कार्य सफल करतोस का ?

स्त्रिया सफल असती का ज्ञानही तसे तुझे ?॥72॥ सफल = सन्तानयुक्त

कच्चिद्देषैव ते बुद्धिर्योक्ता मम राघव ।

आयुष्या च यशस्या च धर्मकामार्थसंहिता ॥73॥

ऐसाच तव बुद्धीचा असे ना निश्चय ज्यामुळे।

वाढवी जो सिद्धी धर्म आयु अर्थ काम यशा ॥73॥

या वृत्तिं वर्तते तातो यां च नः प्रपितामहः ।

तां वृत्ति वर्तसे कच्चिद् या च सत्पथगा शुभा ॥74॥

करसी ना पालन वृत्ति पाळिली प्रपितामहे ।
पाळती सत्पुरुष जी कल्याणदायक असे ॥74॥

कच्चिद् स्वादुकृतं भोज्यमेको नाश्नासि राघव ।
कच्चिदाशंसमानेभ्यो मित्रेभ्य: सम्प्रयच्छसि ॥75॥

एकटा स्वादिष्ट अन्न करसी ना भक्षण ।
न देता मित्रांना इच्छिती खाण्यास ते ? ॥75॥

राजा तु धर्मेण हि पालयित्वा महीपतिर्दण्डधर: प्रजानाम् ।
अवाप्य कृत्स्नां वसुधां यथावदितश्च्युत:स्वर्गमुपैति विद्वान् ॥76॥

अशा प्रकारे विद्वान राजा प्रजापालन करूनी दण्डधारी ।
कह्यात घेऊनि सर्व पृथ्वी देह त्यागिता करी स्वर्ग प्राप्त ।।76।।

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे शततमः सर्गः।।100।।**

# अयोध्याकाण्ड सर्ग 101

तं तु रामः समाज्ञाय भ्रातरं गुरुवत्सलम् ।
लक्ष्मणेन सह भ्रात्रा प्रष्टुं समुपचक्रमे ॥1॥

समजावुनिया भरता रामाने लक्ष्मणासह ।
गुरुभक्ता अनुरक्ता विचारी त्या पुढे असे ॥1॥

किमेतदिच्छेयमहं श्रोतुं प्रव्याहृतं त्वया ।
यस्मात् त्वं अगतो देशं इमाम् चिरा जटा जिनाः॥2॥

यन्निमित्तमिमं देशं कृष्णाजिनजटाधरः।
हित्वा राज्यं प्रविष्टस्त्वं तत सर्वं वक्तुमर्हसि ॥3॥
राज्य सोडुनी करुनी जटा वल्कल धारण ।
कशास्तव इथे येसी इच्छितो कारण जाणण्या ॥2॥
कश्यामुळे या देशी मृगाजिन जटा धारुनी
ऐकण्या तव मुखे सर्व यथोचित सांगसी मला ॥3॥
इत्युक्तः केकयीपुत्रः काकुत्स्थेन महात्मना ।
प्रगृह्य बलवद् भूयः प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत ॥4॥

ऐसे विचारता काकुत्स्थे शोक दाबुनि अंतरी ।
हात जोडुनिया बोले कैकयीपुत्र असे तया ॥4॥
आर्य तात: परित्यज्य कृत्वा कर्म सुदुष्करम् ।
गत: स्वर्गं महाबाहु: पुत्रशोकाभिपीडित:॥5॥
आर्य तात महाबाहु कर्म दुष्कर करोनिया ।
पुत्रशोके पीडित ते जाती स्वर्गलोकी तदा ॥5॥
स्त्रीया नियुक्त: कैकेय मम मातृ परंतप ।
चकार सा महत्पापमिदमात्मयशोहरम् ॥6॥

मम माता कैकेयीच्या आग्रहे विवश होउनी ।
कठोर वर्तन करती यशहारक पाप जे ॥6॥

सा राज्यफलमाप्राप्य विधवा शोककर्शिता ।
पतिष्यति महाघोरे नरके जननी मम ॥7॥

राज्यफला प्राप्त ना करिता विधवा बने ।
महाघोर नरकात पडे शोकदुर्बल ॥7॥

तस्य मे दास भूतस्य प्रसादं कर्तुमर्हसि ।
अभिषिञ्चस्व चाद्यैव राज्येन मघवानिव ॥8॥

या दास भरतावरी राज्य करुनिया कृपा ।
हाति घ्या करुनि अभिषेक इन्द्रासम करा ग्रहण हे ॥8॥

इमाः प्रकृतयः सर्व विधवा मातरश्च याः।
त्वत्सकाशमनुप्राप्ताः प्रसादं कर्तुमर्हसि ॥9॥

येति प्रजेसह सर्व विधवा माता मजसवे ।
त्वरित त्यांच्यावरती कृपा आपण ही करा ॥9॥

तथानुपूर्व्या युक्तश्च युक्तं चात्मनि मानद ।
राज्यं प्राप्नुहि धर्मेण सकामान् सुहृदः कुरु ॥10॥

राज्यावरि अधिकार ज्येष्ठत्वे आपुला असे ।
मनोरथ सुहृदांचे करा पूर्ण ते स्वीकारुनी ॥10॥

भवत्वविधवा भूमिः समग्रा पतिना त्वया ।
शशिना विमलेनेव शारदी रजनी यथा ॥11॥

तुझ्यासम पति मिळूनी वसुधा होवो न विधवा ।
शारदी रजनीसम शोभो शरत्चन्द्रे सनाथ जी ॥11॥

एभिश्च सचिवैः सार्धं शिरसा याचितो मया ।
भ्रातुः शिष्यस्य दासस्य प्रसादं कर्तुमर्हसि ॥12॥

याचना करतो सर्व सचिवांसह मस्तक ।
ठेउनी चरणी आपुल्या राज्य ग्रहण करी ।
बन्धु,शिष्य मी दास कृपा मजवरि करी ॥12॥
तदिदं शाश्वतं पित्र्यं सर्वं सचिवमण्डलम् ।
पूजितं पुरुषव्याघ्र नातिक्रमितुमर्हसि ॥13॥
सर्व हे मन्त्रिमण्डल पित्यापासुनि या कुली ।
सन्मान करी त्यांचा प्रार्थना त्यांचि मानुनी ॥13॥

एवमुक्त्वा महाबाहु: सबाष्प: लैलयीसुत: ।
रामस्य शिरसा पादौ जग्राह भरत: पुन: ॥14॥
बोलुनी भरत ऐसे साश्रुनयने मस्तक ।
पदांवरि रामचंद्राच्या पुन:पुन्हा टेकवी ॥14॥
तं मत्तमिव मातङ्गं मि:श्वसन्तं पुन:पुन:।
भ्रतारं भरतं राम परिष्वज्येदमब्रवीत ॥15॥
मत्त हत्तीसमान दीर्घ श्वास घेई तया ।
भरता लावुनि छातीस श्रीराम वदती असे ॥15॥

कुलीन: सत्त्वसंपन्नस्तेजस्वी चरितव्रत:।
राज्यहेतो: कथं पापमाचरेन्मद्विधो जन:॥16॥
उत्तम कुलि उत्पन्न सत्त्वगुणी करू कसे ।
पित्राज्ञा उल्लंघण्याचे राज्यलोभे पाप मी ॥16॥
न दोष त्वयि पश्यामि सूक्ष्ममप्यरिसुदन ।
न चापि जननीं बाल्यात त्वं विगर्हितमर्हसि ॥17॥
शत्रुसूद्र मी दोष तुझ्यात काहि न पाहतो ।
अज्ञाने मातेची निन्दा करणे न योग्य तू॥17॥

कामकारो महाप्राज्ञ गुरूणां सर्वदानघ ।
उपपन्नेशु दारेषु पुत्रेषु च विधीयते ॥18॥

पुत्रा स्त्रियांवरी पूर्ण अधिकार सदा असे ।
गुरुजनांचा आज्ञा ते कोणतिहि देऊ शकती ॥18॥

वयमस्य यथा लोके संख्याताः सौम्य साधुभिः।
भार्याः पुत्राश्च शिष्याश्च त्वमपि ज्ञातुमर्हसि ॥19॥

तसे भार्या पुत्र सर्व महाराजा शिष्यांसम ।
आज्ञा त्यांची योग्य जाणण्यास समर्थ तू ॥19॥

वने वा चीरवसनं सौम्य कृष्णाजिनाम्बरम् ।
राज्ये वापि महाराजो मां वासयितुमीश्वरः॥20॥
वल्कले मृगचर्म वनी धारण करुनी राहणे ।
वा राज्यावर बसणे दोन्ही त्यांच्या आधिन ॥20॥
यावत पितरि धर्मज्ञ गौरवं लोकसत्कृते ।
तावद् धर्मकृतां श्रेष्ठ जनन्यामपि गौरवम् ॥21॥
गौरवबुद्धि पित्यात जेवढी विश्ववंद्य जे।
तेवढीच मातेत असावी धर्मात्म्या भरता ॥21॥

एताभ्यां धर्मशीलाभ्यां वनं गच्छेति राघव ।
मातापितृभ्यामुक्तोऽहं कथमन्यत् समाचरे ॥22॥

मातापिता धर्मशील आज्ञापिता जाण्या वना ।
विपरीत वर्तन त्याच्या कसे करु सांग मी ॥22॥

त्वया राज्यमयोध्यां प्राप्तव्यं लोकसत्कृतम् ।
वस्तव्यं दण्डकारण्ये मया वल्कलवाससा ॥23॥

अयोध्येत राहुनि तू राज्य वंद्य जगा करी ।
राहणे दण्डकारण्ये वल्कले मज धारुनी ॥23॥

एवमुक्त्वा महाराजो विभागं लोकसंनिधौ ।
व्यादिश्य च महाराजो दिवं दशरथो गत:॥24॥

लोकांसमोर महाराज आज्ञा दोघांस वेगळ्या ।
देउनी आपणा दोघां झाले स्वर्गवासि ते ॥24॥

स च प्रमाणं धर्मात्मा राजा लोकगुरुस्तव ।
पित्रा दत्तं यथाभागमुपभोक्तुं त्वमर्हसि ॥25॥

धर्मात्मा लोकगुरु राजा प्रमाण मानुनिया तया ।
पिता देइ तुला त्याचा उपभोग घेण्या पात्र तू ॥25॥

चतुर्दश समाः सौम्य दण्डकारण्यमाश्रितः।
उपभोक्ष्ये त्वहं दत्तं भागं पित्रा महात्मना ॥26॥
राहूनि दण्डकारण्ये चौदा वर्षानन्तर ।
राज्याचा या पितृदत्त उपभोग घेईन मी ॥26॥
यदमब्रवीन्मां नरलोकसत्कृतः पिता महात्मा विनुधाशिपोपमः।
तदैव मन्ये परमात्मनो हितं न सर्वलोकेश्वरभावमव्ययम् ॥27॥
सन्माननीय पिता मनुष्यलोके इन्द्रासमान जी देइ आज्ञा मला।
सर्वलोकेश्वर अविनाशी पदही आज्ञेविण त्यांच्या न श्रेयस्कर मज॥27॥

# इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकाधिकशततमः सर्गः ॥101॥

# अयोध्याकाण्ड सर्ग 102

रामस्य वचनं श्रुत्वा भरतः प्रत्युवाच ह ।
किं मे धर्माद् विहीनस्य राजधर्मः करिष्यति ॥1॥

रामाचे वचन ऐकून भरत उत्तर करी ।
नसता राज्याधिकारी धर्मविहीना मजला।
कोणता राजधर्म कशास उपदेश हा ?॥1॥

शाश्वतोऽयं सदा धर्म:स्थितोऽस्मासु नरर्षभ ।
ज्येष्ठ पुत्रे स्थिते राजा न कनीयान्‍ भवेन्नृप:॥2॥
शाश्वत असे हा धर्म ज्येष्ठ पुत्र असताना ।
कनिष्ठ होत नसे राजा नरश्रेष्ठ हे जाणता ॥2॥
स समृद्धां मया सार्धमयोध्यां गच्छ राघव ।
अभिषेचय चात्मानं कुलस्यास्य भवाय न:॥3॥
तदा चला रघुराया समृद्ध अयोध्यापुरी ।
कुल अभ्युदयासाठी करा अभिषेक आपणा ॥3॥

राजानं मानुषं प्राहुर्देवत्वे सम्मतो मम ।
यस्य धर्मार्थसहितं वृत्तमाहुरमानुषम् ।।4।।
राजास मानति सर्व लोक मानव तो जरी।
मी मानतो तया देव जे साधारण मानवा।
अशक्य असे धर्म अर्थ आचरण तो करी ।।4।।
केकयस्थे च मयि तु त्वयि चारण्यमाश्रिते ।
धीमान् स्वर्गं गतो राजा यायजूकः सतां मतः ।।5।।

**कैकेयदेशी असता मी वनी असता आपण ।**

**धीमान दशरथ गेले आम्हा सर्वांस सोडुनी ॥5॥**

**निष्क्रान्त मात्रे भवति सहसीते सलक्ष्मणे ।**

**दु:खशोकाभिभूतस्तु राजा त्रिदिवमभ्यगात ॥6॥**

**सीता लक्ष्मणासह जाता राज्य सोडुनि आपण ।**

**दशरथ राजे जाती स्वर्गलोकी दु:खपीडित ॥6॥**

**उत्तिष्ठ पुरुषव्याघ्र क्रियतामुदकं पितु:।**

**अहं चायं च शत्रुघ्नः पूर्वमेव कृतोदकौ ॥7॥**

उठा पुरुषसिंहा जलाञ्जलि द्या पित्या ।
शत्रुघ्नासह आम्ही जलाञ्जलि दिली असे ॥7॥

प्रियेण किल दत्तं हि पितृलोकेषु राघव:।
अक्षयं भवतीत्याहर्भवांश्चैव पितु: प्रिय:॥8॥

पित्याचे परम पुत्र आपण असल्यामुळे ।
जलाञ्जली तव होई पितृलोकात अक्षय ॥8॥

त्वामेव शोचस्तव दर्शनेप्सुस्त्वय्येव सक्तामनिवर्त्य बुद्धिम् ।
त्वया विहीनस्तव शोकरुग्णस्त्वां संस्मरन्नेव गत: पिता ते ॥9॥


शोकार्त होऊनि तुमच्या वियोगे मनी ठेउनि दर्शनेच्छा ।
बुद्धी तुम्हावरि राहुनि आठवोनी तुम्हास ते जाति स्वर्गलोकी ॥9॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे वुअधिकशततम: सर्ग:**
**॥102॥**


श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.








श्याम कुलकर्णी
तुझी माझी जोडी


हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हसरी वारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION

वाल्मिकीरामायण- ९





मराठी




श्याम कुलकर्णी




मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय भाग आठवा

www.esahity.com